प्रकरण - दुसरे

नारायण सुमंत यांच्या कवितांची आशयसूत्रे

पहिल्या प्रकरणामध्ये आपण मराठी कवितेची पूर्वपरंपरा पाहिली. यामध्ये महात्मा फुलेंच्या पासून या कवितेला अनेक वळणे लागलेली दिसतात. जानपद कविता, बहिणाबाई चौधरी, आनंद यादव, ना.धों.महानोर अशा काही ठळक कवींचाही समावेश या काळात होतो. इ.स.१९८० नंतरच्या काव्यलेखनामध्ये नारायण सुमंत हेही महत्वाचे नाव आहे. स्वत: शेतीमध्ये राबणा-या या कवीने मराठी कवितेत आपला वेगळा ठसा उमटविला. त्यांच्या कवितांची आशयसूत्रे आपण आता पाहू.

नारायण सुमंत यांचे तीन काव्य संग्रह प्रसिद्ध आहेत. *रानमैरी (१९८३), वृक्षवेद(१९९३), सातबारा(२००२)* हे त्यांचे तीन काव्यसंग्रह दहा वर्षांच्या अंतराने प्रसिद्ध झाले आहेत. या तीन काव्यसंग्रहातील कवितांमध्ये वेगवेगळी वैशिष्टये आहेत. *रानमैरीत* तीन भाग आहेत. पहिल्या भागात प्रेमकविता आहेत. तर दुस-या भागात वृक्षांवर कविता आहेत. तर तिसरा भाग वास्तववादी कवितांचा आहे. *वृक्षवेद* हा काव्यसंग्रह फक्त वृक्षांचेच सर्व अंगाने चित्रण करतो. रानमैरीतील झाडे या विभागाचा येथे अधिक विस्तार झाला आहे. त्याचेच प्रगल्भ रुप येथे दिसते. तर सातबारा मध्ये शेतक-यांच्या व्यथा वेदनांचे दर्शन घडते. हा काव्य संग्रह पूर्णपणे वास्तववादी आहे. म्हणजेच नारायण सुमंत यांच्या कवितेत निसर्ग व वास्तववाद यांचे अपूर्व असे मिश्रण आहे. त्यांच्या कवितांच्या आशयाच्या दृष्टीने अनेक गट पडतात. त्या वेगवेगळ्या गटानुसार आपण त्यांच्या कवितांची आशय सूत्रे पाहू.

वृक्षाविषयक कविता

नारायण सुमंतांच्या सर्वाधिक कविता वृक्षांसंबंधी आहेत. त्यांच्या वृक्षांसंबंधीच्या कविता पाहिल्या की, हा कवी किती वृक्षाळलेला आहे हे लक्षात येते. वृक्षासंबंधी इतक्या मोठ्या प्रमाणात काव्य लेखन केलेला हा मराठीतील पहिलाच कवी असावा. वृक्षांचे सौंदर्य, स्वरुप याचबरोबर या वृक्षांच्या वृत्ती, त्यांचे मोठेपण, वैशिष्टय, त्यांच्या वेदना, त्यांचा बहर, त्यांचा जीवनक्रम, मानवाशी असणारा सहसंबंध, वृक्षाचा अंत या सर्व वृक्षासंबंधी बाबींचा आपल्या कवितेत कवीने सविस्तर विचार व अविष्कार केला आहे. वृक्षांचा मानवी जीवनाशी असणारा संबंध अनन्यसाधारण आहे. त्यातल्या त्यात कृषिजीवनाशी वृक्षांचा

संबंध जिव्हाळ्याचा व खोलवर आहे. त्यामुळे ही कविता शेतक-यांच्या जीवनाचा खराखुरा अविष्कार घडवते असे म्हणणे योग्य होईल.

वृक्षांचे स्वरुप, सौंदर्य व वैशिष्टये अभिव्यक्त करणा-या कविता

कवी नारायण सुमंत आपल्या कवितेत वृक्षांचे स्वरुप, त्यांचे सौंदर्य व वैशिष्टये सांगताना दिसतात. हे सांगत असताना त्यांनी झाडांचा खोलवर विचार केलेला दिसतो.

झाडे कशी असतात हे सांगताना कवी म्हणतो - झाडे जितकी आभाळासारखी उंच असतात तितकीच जमीनीमध्ये खोलवर रुजलेली असतात. निसर्गाच्या रुपाप्रमाणे ती बदलत राहतात. ऊन्हांत झाडे ऊन होतात तर पावसात पाऊस होऊन जातात. झाडांचे हे एक वैशिष्टयच मानायला हवे म्हणूनच कवी म्हणतो -

झाडे जितकी / अभाळ उंच, / तितकीच खोलवर / मातीत रुजलेली![१]

वरवर आपल्याला झाडाचे जे स्वरुप दिसते त्यामध्ये झाडाची पाने, फांद्या, फुले आणि फळे दिसतात. पण कवीला वाटते याहीपेक्षा झाडाचे स्वरुप अधिक वेगळे आहे. त्याला वेगवेगळ्या संदर्भाची खोल अशी मुळेही आहेत. ही मुळे जमीनीमध्ये खोलवर जातात. त्याचप्रमाणे झाडाला आकाशातही वेगळे संदर्भ असतात म्हणून कवी म्हणतो -

फांदी फांदीत / मिटून ठेवलेल / आकाशव्यापी डोळे![२]

म्हणजेच झाडे जमीनीत मुळांद्वारे खोलवर रुजतात त्याचप्रमाणे त्यांनी आकाश व्यापणारे असे डोळे फांदीत मिटून ठेवलेले असतात असे कवीला वाटते.

निसर्गातील अनेक घटक एकमेकाशी पूरक असतात. उन्ह आणि झाडे यांचेही नाते असेच एकमेकाशी पूरक असे आहे. या उन्हाचा अर्थ फक्त झाडांनाच कळतो. कारण त्या दोघांचा सहवास अधिक असतो. या उन्हाचे स्पर्श झाडांना पोसतात. पाने या उन्हातच मोठी होतात. पण पानांचे वेगळेपण सावलीत हरवून जाते. तरीही कवीला वाटते.

उन्हाचे आभाळ दु:ख / फक्त झाडेच पेलणारे![३]

उन्हाला जे आभाळासारखे दु:ख आहे ते दु:ख फक्त झाडेच पेलतात. उन्हाचे हे आभाळदु:ख कोणते तर, उन्हाचे एकाकीपण उन्हाला ढगांची, वा-याची कोणाचीच साथ नसते. त्यांना साथ देणारी फक्त झाडे असतात.

तरीही, झाडे हिरवीगार राहतात. डेरेदार आकार धारण करतात. जणू काही आभाळाच्या तुकड्याचे हिरवे हिरवे आकार असावेत असे कवीला वाटते. उन्हाळ भार झाडांना सहन करावे लागतात हे सांगताना कवी म्हणतो -

पानोपानी झाडांना / आकाशव्यापी उन्हाळभार [४]

या निसर्गामध्ये अनेक हंगाम येतात व जातात पण झाडे त्या हंगामानुसार बदलत नाहीत तर झाडेच हंगाम बदलतात. (झाडावर हंगामच पाखरांचे अस्थायी मुक्काम विसरून जातात.) निसर्गात कितीतरी बदल होत राहतात. पण झाडे पूर्णपणे त्या निसर्गानुसार बदलत नाहीत. ढग येतात जातात, आभाळाचे रंगही बदलतात, वादळे उठतात, या वादळातील वा-यानुसार वावड्याही उठतात. हंगाम येतात व जातात त्या हंगामाचे निशाण असणा-या गोष्टीचे रंगही बदलतात. झाडे हे सर्व अनुभवतात, या सर्व बाबींना समजून घेतात. या सर्व घडामोडींनुसार बदलावे तेथपर्यंत ते बदलतात असे सांगून कवी पुढे म्हणतो-

'एरवी वा-याला थोपवीत / झाडे हिरवीगार राहतात! [५]

झाडे निसर्गाच्या विरुद्धही वागतात. नेहमीच ती निसर्गाशी सुसंगत वागतात असेही नाही. उन्हे जेंव्हा वाढत जातात आणि पाऊस भेटेनासा होतो तेंव्हाही झाडे मोहरतात. सावलीसाठी पण काही वेळा भर पावसातही झाडांना जेंव्हा झाडपण असह्य होते तेंव्हा मात्र -

झाडे वठून जातात / रक्तहीन क्रांतीसाठी ! [६]

झाडे जेंव्हा अंकुरतात त्यावेळीच ते आपल्या मनात बहर पेरतात. त्यांचा ओढा नेहमी बहाराकडेच असतो. त्यांना कधी खुडलं जातं तर कधी ती सुकतात, तर कधी ती पावसाविना वठतात. हे सारे दु:ख फुलताना मात्र झाडे विसरतात. म्हणूनच, कवीला वाटते की झाडांना उन्हाळ्यातही नवी पालवी येत असावी म्हणूनच कवी म्हणतो -

त्याच्याचसाठी उन्हाळे / पाणकळाचे हंगाम होतात[७]

मानवी जीवनातील विरक्तीची जाणीवही झाडे काही वेळा करून देतात. अशाच एका झाडाच्या समाधिस्थ रुपाचे वर्णन कवी करतो. संध्याकाळी झाडांची पाने विरक्तपणे खाली झुकून मावळतीच्या उन्हात चमकत राहतात. फुलून गेलेली फुले पाकळी-पाकळी गाळून विदेही होतात. फांद्यातही नव्हाळ सळसळ आता वयस्कपणे शांतवलेल्या असतात. झाडांना पडलेल्या वेलींच्या मिठीची संवेदनाही झाडाला आता पिकल्यासारखी वाटते. अशावेळी मावळतीची उन्हे झाडांना मावळ उन्हाचे कफन देतात. त्यावेळी-

झाडे / आणि उदयाच्या सूर्यासाठी / झाडे समाधिस्थ होतात[८]

झाडांना निसर्गाकडून जे काही मिळते ते निसर्गातील इतर घटकांपेक्षा अप्रूप असे आहे. झाडांच्या आकारमानातही विविधता आहे. झाडे भव्यगर्द असतात. तशी ती झुडपांच्या रुपातही असतात. एखादे फुटव्यासारखे असते तर काही सुरुसारखी ताडमाड उंच असतात. काही झाडात गोडवा आहे तर काही मरुसारखी आहेत. पण ही विविधता फक्त झाडांनाच कळते. बाकीच्या लोकांच्या दृष्टीस मात्र -

भोवतालचे फूलपण / काट्यांना सलतेच![९]

निसर्गातील अनेक घटकांशी झाडांचे नाते आहे तसेच पक्ष्यांशीही झाडांचे नाते अतूट आहे. उन्हे गडद होतात त्यावेळी सर्व पक्षी झाडांच्या पानांच्या सावलीमध्ये येऊन विसावतात. त्यामुळे जणू काही पानांचेच पक्षी होतात. फांदी फांदीचे हिंदोळे घरट्याचे रुप घेतात. उन्हे मावळतीला जातात त्यावेळी सर्व पक्षी झाडावर बसून किलबिलाट करतात त्यावेळी -

अशा फातरवेळी / झाडेच... पक्षी होतात![१०]

झाडाला निसर्गाकडूनच लावण्य प्राप्त होते. झाडाचे हे एक लेणे असते. त्या लेण्याला निसर्गातील घटकांचे सहाय्य असते. आभाळातील थेंबांना झाडाने फांदीफांदीत गोंदून घेतलेले असते. झाड मातीच्या पायावरती उभे राहून ऊन-पावसात हरवून जाते. याचमुळे झाडाला-

वैशाखाच्या भर उन्हात / श्रावणाचे हिरवे गाणे गाता येते.[११]

झाडांच्या फांद्याफांद्यातून वारे वाहू लागते तेंव्हा झाडे धून मग्न होतात. हीच झाडे कोवळीक झोकून देऊन फूलपणापलीकडे जातात. त्यावेळी ती विकारनग्न होतात. नैसर्गिक हानी झाडे विकाराच्या पलीकडे जाऊन सहन करतात. त्याचप्रमाणे अनैसर्गिक हानी पेलण्याचे सामर्थ्य झाडामध्ये आहे. झाडाच्या भोवती येतच असतात नेहमी कु-हाडीचे हात. उमेदीतल्या फांद्यांच्या देठादेठात घात होत असतो. पण फांद्या छाटलेली झाडे नाउमेद होत नाहीत. कारण त्या झाडांच्या फांद्यांच्या सांदीमध्ये पुन्हा फुलण्याचे सामर्थ्य असते. म्हणून ते सामर्थ्य पुन्हा एकदा झाडाला-

कोंभा-यांना उभारून / गर्द ताटवा होणे[१२]

असे रुप प्राप्त करून देतात. झाडांचे वाढणे असेच चालू राहते. मध्य रात्री नंतरचे भजननाद झाडांना गोंजारतात त्यावेळी पानांच्या अंतरीचे हिरवेपण देठांना जागवत ठेवते. त्याचवेळी झाडातील काष्ठधारा कळ्यांचं फूल होण्याचे व फूलांचे फळ होण्याचे स्वप्न पूर्ण करत असते त्यावेळी झाडे

उगवतीच्या उगव रंगातून / झाडे वेधतात कृष्णधारा[१३]

झाडे प्रतिकूल परिस्थितीतही वाढतात. काही वेळा माथ्यावरचे आभाळपण (पाऊस देण्याची शक्ती) संपून जाते. त्यावेळी दुष्काळ उन्हातून उतरतो. पाने केविलवाणी होतात. फुले उजाड होतात. हिर्व्यागार घनराईचे अस्मानामध्येच झुले अडकतात. नवीन फुलू लागलेल्या रोपट्यांची मुळे सुकून जातात. नाजूक मेंदीसारख्या वेलींच्या डोळ्यांचे तळे कोरडे पडते. अशा दुष्काळ परिस्थितीत झाडे हबकतात, केळीही आपला गर्भ टाकतात. पणथळाच्या गारव्यावरचेही गवत झुरून मरते. अशा दुष्काळी परिस्थितीतही एखादे झाड बंड करून वाढते त्याला कवी *तुकारामते* हा शब्दप्रयोग करतो. संत तुकारामनी ज्याप्रमाणे समाजव्यवस्थेविरुद्ध बंड केले त्याप्रमाणे एखादे झाड दुष्काळी परिस्थिती विरुद्ध बंड करते. शुष्कावल्या काष्ठधारेतून आभाळाला शृंगारते. खोडव्यातून फुलून येऊन माळाला हिरवाळते. ढगाशिवाय झाडाच्या अंतरी पाऊस पडतो. आभाळाची माया नसतानाही त्या माळावरती त्या झाडामुळे मायेचा ऊरुस होतो. असे माथीचे आभाळपण संपले तरी-

झाडपणी झाडा जागवण्या / एखादेच झाड तुकारामते[१४]

पण तरीही हेच बहर काही वेळेस झाडाला काचत असावेत असे कवीला वाटते. हा प्रश्न कवीला पडतो कारण फूलांच्या गंधातून झाड उदासताना कवीने पाहिले आहे. फळ संभाराने फांदीचा होणारा कडाड कवीने ऐकला आहे. झाडाला नवी पालवी फुटताना झाडाच्या डोळ्यातून ठिबकणारे पाणी कवीने पाहिले आहे. कळी कळी प्रसवताना झाडाला होणा-या अनावर कळा कवीने जाणल्या आहेत. झाडाच्या या प्रत्येक बहरात झाडाला या वेदना सहन कराव्या लागतात तरी झाडाला फुलण्याचे बहरण्याचे एक सनातन वेड आहे. म्हणूनच कवी म्हणतो -

झाडांना काचत नाहीत / आपलेच बहर / असे म्हणावे तरी कसे? [१५]

झाडाच्या या विकासाचाही एक क्रम ठरलेला असतो. मानवाला ज्याप्रमाणे एखादी वस्तू मिळाल्यानंतर तो दुसरी वस्तू मिळविण्याचा हव्यास धरतो. त्याचप्रमाणे झाडाच्या बाबतीतही तसे घडते. झाडाचे बीज रुजताच त्या बीजाला अंकुराचा छंद जडतो. अंकुर झाले की त्या अंकुराला रोपाचा छंद जडतो. रोप निर्माण झाले की त्या रोपाला डहाळ्यांचा छंद जडतो. डहाळ्या निर्माण झाल्या की त्या झाडाला फुलांचा छंद जडतो. फूल निर्माण झाले की त्या झाडाला फळांचा छंद जडतो. ते झाड फळाला येते. त्यात बीज निर्माण होते. ते बीज निर्माण झाल्यानंतर मात्र झाड छंदाच्या पलीकडे जाते. झाडाच्या या विकासापाठीमागे मातीची सृजनशीलता व आभाळाची आदिमता उभी असते. म्हणूनच झाडाला काष्ठधारेचा ध्यास लागतो त्यावेळी मात्र झाडांना -

झाडाला मोहवित नाही जेंव्हा / भोवतालची बहरधारा [१६]

असेच झाडाचे वागणे अलिप्तपणाचे असते. भोवती गंधार उमलत असेल, वर्षाचा हंगाम चालू असला तरी झाडाचे डोळे निपचित असतात. गूढ मातीच्या अंधारात मुळे सैलावत आपल्या भोवताली वनराईचे घनगर्द जाळे तयार करत असतात अशावेळी -

झाडाच्या उरात सरल्या दिसाचे / मातीवेधी खळे [१७]

झाडाचा बहर तरी कसा असतो? तर कवी एका बहराचे वर्णन करतो. हा बहर जंगलातून सांडत गेला. त्या बहराचे मोजमाप कोणी उन्हातून करेल तर कोणी पावसातून, तर कोणी फुलापानातून करेल. त्या बहराचा डोळ्यापलीकडचा रंग अजूनही जंगलात थिजून आहे. कोणाला वाटेल या बहरामुळेच जंगल निर्माण

झाले. तर कोणाला वाटेल या बहराबरोबरच जंगल गेले. तरीही या बहराचे अनाहत सूर अद्याप या जंगलातील या-यातून येत आहेत म्हणून कवी म्हणतो-

नुकताच एक बहर / सांडत गेलाय जंगलातून[१८]

तरीही कवीला वाटते नुसत्या पावसाने झाडे वाढली जात नाहीत. झाडात अशी कोणतीतरी शक्ती असते जी पावसाच्या थेंबाद्वारे आपली वाढ करून घेतात. म्हणून कवी म्हणतो जर पावसानेच नुसत्या झाडे वाढली असती तर दगडालाही फळे आली असती. पाऊस जसा झाडावर पडतो त्याचप्रमाणे दगडांवर व माणसांवरही पाऊस पडतो. पण झाडाव्यतिरिक्त इतरांत ओल दिसत नाही. म्हणूनच कवीला वाटते जर नुसत्या पावसानेच झाडे वाढली असती तर-

कदाचित दगडाला फळे / आणि माणसाला फुले / आली असती[१९]

म्हणजेच अनुकूलतेची संधी सगळ्यांनाच असते. त्या संधीचे सोने करण्याचे कसब त्या त्या व्यक्तीकडे असावे लागते हा ही संदेश कवी देऊ पाहतो.

ही झाडे वाढत असतानाही बाह्य सर्व भुलविणा-या गोष्टींना टाळून विकसित होत असतात. आपल्यावर झालेले घाव व त्यांचे व्रण पाकळ्यांवर पसरवत असतात. तरीही फूलपणासाठी काष्ठपरंपरेचे गंधित पराग डोळ्यांवर नोंदवणे झाडांना अपरिहार्य असते. हे नोंदविणेही सांकेतिक वंशलिपी बीजामध्ये असते. म्हणूनच केंव्हाही -

भोवतालचे रंग घेऊन / डोकाऊ नये झाडात[२०]

झाडाच्या विस्तारातच बीजपण लपलेले असते व बीजपणातच विस्तार लपलेला असतो. झाडाची भव्य गर्दता, हिरवेपण, त-हेत-हेची फुले, फळे, दिसत नसलेली पुष्पमुळे हे सर्व बीजपणात लपलेले असते. मुळाच्या अंकुर रुपातून झाडाची निर्मिती होत असते. नवती हिर्व्या रोपाचे *मी* पण कळत असते त्याचप्रमाणे या बीजामध्येच पुढील विस्तार व वंश ही असतो म्हणून कवी म्हणतो -

झाडाच्या विस्ताराखेरीज / पिकून येणारे बीजपण[२१]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ही झाडे वाढत असली तरी त्यांना उन्हाळ्याचीही ओढ असते. दिवस पानाच्या अंतरीचे हरितकाचे पर्व संपून घरंगळतो त्यावेळी देठाच्या अंतरी फूल रंगाचा ध्यास असतो. वृक्षाच्या तळी पानगळीचा संभार साचतो. अशावेळी काष्ठांतरी खोल गर्भात मातीची ओढ असते. ही झाडाच्या ठिकाणी उगवलेली पूर्ण जाण ही उन्मळण्याची असते असे कवीला वाटते.

असेच दिवसभर वारे आणि बहर प्रहराशी खेळून पाने निजू लागतात. पाने डहाळ्यांना थोपटतात आणि फांद्याही निजू लागतात. झाडाच्या मनात चांदण रात्र असते. ते झाड पाने, कळ्यांना, डहाळ्यांना साशंकित मनाने तपासत आपल्या मुळांचा विस्तार करत असते. उद्याच्या त्या पानांच्या, कळ्यांच्या, डहाळ्यांच्या तहानभुकेसाठी ही मुळे अंधारातच विस्तारतात.

निरखीत पानाकळ्यांना डहाळ्यांना / चांदण अंधारात[२२]

या झाडांना झाडपण कधी येते तर त्या कोण्या एका द्विदलातून अंकुर वाढतो. या अंकुराला हिरवट छोटी पाने, दांडया येतात. झाडाची ही रोपाच्या अवस्थेपर्यंतची जी वाढ असते ती स्वत:साठी असते कारण या अवस्थेपर्यंत या झाडाचा उपयोग इतरांना नसतो. पण पूर्ण अवस्थेतील झाडाचा उपयोग मात्र मानव व पशुपक्षांना होतो म्हणूनच कवी म्हणतो -

स्वत:साठी वाढणे सोडले / आणि तिला.... / झाडपण आले[२३]

या झाडांना हे मोठेपण कोठून येते तर त्यांच्या या भव्यतेत मागील हंगामाचे पालव असतात. मागील हंगामाचे उत्सव असतात. उत्सवातूनच उमललेले डोळे, उमटलेले अंकुर असतात या जमेच्या गोष्टीबरोबरच झाडांमध्ये-

उत्सवानंतरचे पोसलेले..... / .....अश्रूपूर.....[२५] *ही असतात.*

तरीही या झाडांना झाडपण म्हणावे तितके सहज साध्य नसते. त्यांना खुडणारे हात असतात. तुडवणारे पाय असतात. नजरावणारे डोळे असतात. वठवणारे दुष्काळ, करपवणारी उन्हे असतात. त्यांना वाहून नेणारे पाणी आणि त्यांना उन्मळू पाहणारे वारे ही सर्व संकटे त्यांच्यावर येत असतात. पण या संकटाचा सामना करत त्या संकटाने निर्माण झालेल्या खुणा फांदीत गोंदत, सर्व तपशील पाना पेरात नोंदत झाडे वाढतात. रोपट्यांची झुडपे होतात, झुडपांची झाडे होतात व उजाडपण संपवत-

माळरानाचीच / घनगर्द जंगले होतात[२६]

या झाडांची पाने अंधारात गुदमरतात म्हणून झाडांचे वाढणे प्रकाश दिशेला असते. भोवतालची कुंपणे टाळून भोवतालच्या भिंती टाळून ही झाडे प्रकाशाशी एकरूप होतात. प्रकाश दिशेला वाढत जातात; आणि त्यातूनही काळोख कुंपणे भिंती अगदीच असह्य झाल्या तर झाडे खोडाची परंपरागत वळणे मोडतात आणि-

धुमा-यांचे आकाश लक्ष्यी होणे / झाडांचे प्रकाश दिशेने वाढणे[२७]

झाडाची होणारी वाढही कोणत्यातरी पुण्याने होत असावी व झाडाला होणा-या यातना या कोणत्यातरी पापाने होत असाव्यात असे कवीला वाटते म्हणून कवी म्हणतो कोणत्या तरी पापाने बीजाला वृक्षपण येत असावे त्याचप्रमाणे पुन्हा फळांच्या अंतरी बीजपण येत असावे. म्हणजेच मानव ज्याप्रमाणे जन्ममृत्यूच्या फे-यात त्याच्या पापामुळे अडकतो त्याचप्रमाणे ही झाडे अडकतात. कोणत्यातरी तापे झाडाची पानगळ होते व ग्रीष्मात पुन्हा पाने फुटतात. झाडाची ही जशी वेदनादायक अवस्था आहे त्याचप्रमाणे कोणत्यातरी दानाने पानांना हिरवेपण येते. फुलांना रंगाचे दान होते. त्याचप्रमाणे कोणत्यातरी दानाने झुंजणारा वारा झाडाकडे येतो व या झाडाची सर्व यातनांतून मुक्तता करतो म्हणून कवी याला पुण्ये म्हणतो-

कोणत्या पुण्ये / झुंजणारा वारा / आणि उन्मळधारा । कोण्या पुण्ये॥[२८]

याचसाठी कवीला वाटते झाडे या सर्व यातनातून सुटका व्हावी म्हणून वादळांना प्रार्थना करीत असावीत. झाडांना अनेकवेळा भोवतालच्या परिस्थितीमुळे नैसर्गिकपणे बहरता येत नाही. बीजातून झाडे नकळत कोंभारतात. रोप उमेदीने उभारते. फूल वयाची हद्द ओलांडून झाड वयात येऊ पाहते. त्याचवेळी उन्हाळत जातो भोवतालचा परिसर. कळीबहराचे स्वप्न धूसर होत जाते. झाडे उसासतात व बळेच हसत उभी राहतात. अशा पद्धतीने उन्हा-पाण्यात, वादळ-वा-यात आपले झाडपण सांभाळत उभे राहण्याची वेळ झाडावर येते. या परिस्थितीत भव्यतेच्या चित्राची आठवण पुसून टाकावी लागते. या परिस्थितीमुळे जो खुजटपणा झाडाला येतो तोच सांभाळत रोगट बीजे प्रसवत ही झाडे राहतात व ही रोगट बीजे

जन्मतानाच जी प्रार्थितात मातीला / आता नको जन्म दुजे[२९]

झाडाला असा नेहमी संकटाचा सामना करावा लागतो. तसा सामना करण्याची उपजतच देणगी निसर्गाने दिली आहे. झाडे वा-याची सुरावट जाणून घेतात. भोवतालचे वातावरण ज्याप्रमाणे आहे त्याचप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करतात. जेंव्हा वारे बेसुरी होऊ पाहतात त्यावेळी पानेही सैरभैर होतात. झाडाच्या पायाखालची मातीही तीर बदलू लागते. तरीही झाडे या वादळाला फांदीतच जागवतात आणि

येणा-या प्रत्येक नव्या अंकुराला / शिकवतात क्रांतिगीत [३०]

ज्याप्रमाणे मानवाचा जन्म होण्यापूर्वी त्याला जातपात नसते त्याचप्रमाणे माती आड गेलेल्या बीजालाही जातपात नसते, गणगोत नसतात. तोपर्यंत त्यांच्यात मातीचाच आदिमस्रोत असतो. पण जेंव्हा मातीतून हे झाड वर येते; त्याचा अंकुर निसवतो त्यावेळी भोवतालच्या झाडांचा सूर दुष्काळतो. या अंकुराच्या मुखातून पाने प्रसवतात. भोवतालच्या झाडांची मने त्यावेळी साशंकतात. ज्यावेळी या झाडाच्या पर्णदलातून आणखी विस्तार होतो त्यावेळी-

'अरे हे झाड तर अमुक तमुक' चे / झाडवळीतून होतात वार [३१]

कवीला वाटते काही झाले तरी झाडाने कोणत्याही परिस्थितीत आपली अभंगता सोडू नये. जरी वारे भेंडाळू लागले. दिशा सैरवैर झाल्या, आभाळ वादळू लागले, अवकाळ आसुडासारखा फटके मारू लागला तरीही झाडांनी माळ सोडू नये. सालीतून उलू जाऊ नये, त्याचप्रमाणे फळातून तडू नये, आपली अभंगता कायम राखावी असे कवीला वाटते म्हणून कवी म्हणतो-

काष्ठधारेच्या ध्यासाची / अभंगता घ्यावी मनात [३२]

तरीही झाडासह जंगल घोळात आहे असे कवीला वाटते. कारण वणव्याने काही झाडे व बीजे होरपळतात पण तरीही त्यांचे झाडपण संपत नाही. वा-याची दिशा बदलतात. काही नवी झाडे वाचतात. या झाडांना वादळाचे तितकेसे भय नाही कारण वादळ पश्चिमेकडील असो वा पूर्वेकडील मोडलीच तर मोडतात जूनवान खोड. पण तरुण झाडे मात्र मी मी म्हणणा-या सुसाट वा-याचेही फांदीत अडवतात घोडे. रात्रीचे दंगाखोर झाडतोडे भेटतात पण सकाळी त्यांच्या फक्त खुणाच उरतात. मात्र अरण्याला व येथील झाडांना भूमिगत मूळांची बंडखोरी घातक आहे. विस्तारासाठी कोंभारे व धुमा-यांनी केलेली प्रदेशचोरीही

घातक आहे. ही बंडखोरी, ही प्रदेशचोरी अवघे झाडपणच खाऊन जाईल अशी भिती कवीला वाटते म्हणून कवी म्हणतो-

मग कुठे उरते जंगल? / हल्ली घोळ्यात आहे झाडांसह जंगल[३३]

तरीही झाडे प्रतिकुलतेवर मात करून अनुकुलता निर्माण करणे हा त्यांचा गुणच असतो. झाड उगवताना भोवती जंगल असेल असेच काही नाही. त्याचप्रमाणे झाड फूलपणात येताना आजूबाजूला फूले असतीलच असे नाही. झाडाला उगवावे लागते रखरखीत माळावरतीही. काट्यांचा भार तोलीत पानांना समजायीत एक एक कळी व मुळी प्रसवायी लागते. झाडाची परंपरा जोपासताना सांदी सापटीतून फुटत, ताटवा निर्माण करावा लागतो. अशी जिद्द जोपासावी लागते म्हणून कवी म्हणतो-

असे एकाकी झाडाने म्हणू नये..... / मला जंगल भेटवा[३४]

झाडे अशीच स्वत: दु:ख यातना सहन करीत वाढत असतात. आपल्या झाडांचा विस्तार करीत असतात. झाडांना परिचित असते वा-याच्या झडपेने उन्मळून पडणे, फांद्यांना कडाड जाणे, बहर संपल्यानंतर फुलांचे गळून जाणे, पानांचे पिकून रक्ताळ रंगणं होणे. तरीही झाडे वादळांची प्रार्थना करतात. कारण, वादळामुळे बीजांचे स्थलांतर होते व हे त्यांना माहित असते म्हणून झाडे-

जंगल परंपरेच्या सातत्यापाठी / वैराण प्रदेशाच्या उत्थापनासाठी[३५]

पण झाडे दिसतात तशी साधी सरळ नसतात. तर झाडपणातही काही चकवे असतात. माती पाण्याच्या संगतीने बीजे नादावतात व ऊन वा-याशी नाते सांगताना राईचे वटवृक्ष होतात. ज्यावेळी झाड वाढते त्याबरोबर निसर्गातील काही घटकही झाडांचा आसरा घेतात. झाडाबरोबर मुंग्यांची वारुळे पोसली जातात. झाडांच्या मुळ्यांच्या धक्क्यांनी पवित्र व ज्यामध्ये सर्व शक्तीमान देव राहतो अशी देवळे कोसळतात. त्याच झाडाच्या ढोलीतच विषारी सर्प संसार थाटतात पण देवळाला उध्वस्त करणारे व विषारी सर्पांना पोसणारे झाड मात्र सूक्ष्म अशा वाळवीने उन्मळून पडते हा विरोधाभास आहे म्हणूनच कवीला वाटते-

झाडपणातही काही / चकवे असतात[३६]

तरीही झाडे प्रसन्न असतात. पावसामध्ये झाडे आनंदतात. जसा भोवताली पाऊस कोसळतो तसा झाडांच्या मनामध्ये स्वप्नांचा उरुस निर्माण होतो. जसा पाऊस असतो, जसा उरुस असतो तसाच झाडांचा अंकुर असतो. जसे अंकुर असतात तशी झाडे निर्माण होतात. म्हणून झाडे बदलायची झाल्यास पाऊस बदलावा लागतो म्हणून कवी म्हणतो-

बदलावेत उरुस थोडे / तेंव्हाच बदलतात झाडे[३७]

झाडांचे स्वरुप, त्याची वैशिष्टये; त्याचे रुप, रंग, गंध यांचे शब्दचित्र कवी या कवितांमधून रेखाटतो. झाडांच्या उल्करित करणा-या छटांबरोबरच, त्यांना सहन कराव्या लागणा-या यातनांचे चित्रणही कवी करतो. झाडांच्या वृत्ती प्रवृत्तींचे दर्शनही या कवितेत घडते. खरे तर कवी झाडाच्या अंतर्मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न आपल्या प्रतिभेद्वारे करताना दिसतो.

तीन व्यक्तिरेखा

मराठी वाङ्मयामध्ये विविध प्रकारच्या वृत्ती-प्रवृत्तींच्या व्यक्तिरेखा आपण पाहिलेल्या आहेत. तशाच प्रकारच्या काही अमानवी व्यक्तिरेखा ही मराठी साहित्यात आलेल्या आहेत. उदा.काही प्राणी काही वास्तू इ. नारायण सुमंत आपल्या प्रतिभेने तीन वेगवेगळ्या प्रकारच्या वृक्षांच्या व्यक्तिरेखा उभ्या करतात.

रानमैरी या काव्यसंग्रहात 'झाडे' विभागातील '२२' क्रमांकाच्या कवितेत 'हादगा' या झाडाची व्यक्तिरेखा कवी रेखाटताना दिसतो. हा हादगा फांद्यावर आभाळपक्षांचा उखाणा घेऊन मोहरतो. असे कवी म्हणतो कारण या हादग्याची फुले उलटी टांगलेल्या अवस्थेत असतात. म्हणून कवीला ती फुले उलटे टांगलेले आभाळपक्षी भासतात. हा मोहरलेला हादगा दिवसाच्या पाखरांना नेहमीच भुलवतो. तसा हादग्याचा मोहर प्रत्येकाच्या मोहरात हंगामानुसार झिंगत असतो. पण या उखाण्यालाही पानगळीच्या देण्याचा शाप आहे. एरवी हा हळवा हादगा नेहमीच गातो.

फांदीतल्या फुलांचे, / झुंबर गाणे![३८]

या हादग्याची व्यक्तिरेखा कवी हळुवार वृत्तीने चित्रित करतो. हादग्याची फुले नाजूक असतात. असाच लाजरा डौल या व्यक्तिरेखेत कवीने निर्माण केला आहे.

14493

अशीच व्यक्तिरेखा *शेवरी* या झाडाची कवी चितारतो. शेवरीच्या कोवळ्या पंखांची पाखरं तिच्या पानापानावर असतात. (शेवरीची पाने व फुले छोटी छोटी असतात.) त्या तिच्या फुला, पानावर किंचित मन रेंगाळते. दिवसा बरोबर चढती उतरती उन्हं तिला हळदून टाकतात. तिचे उफाडतं सौंदर्य पाहण्यासाठी रात्रीच्या चांदण्या उतरतात. शेवरी वयात आल्या पासून रोज तिला वारा पिंजतोय. येथे वारा ही प्रतिमा पुरुषप्रधान आहे. त्याच्या या पिंजण्यामुळे

कोवळ्या पंखांची पाखरं / आता होतील फुलोरा![३९]

येथे कवीने शेवरी हे उच्छृंखल शृंगाराचे प्रतिक मानले आहे. शेवरीला लवकर फुले लागतात म्हणजे ती वयात येते त्याचप्रमाणे ती ताडमाड वाढते पण तिचा विस्तार नसतो व तिला पाने फुलेही छोटी-छोटी असतात. लवकर वयात येणा-या व ताडमाड वाढणा-या स्त्रीचे प्रतिक कवी मानतो.

याचप्रमाणे *तरटी* या वृक्षाचीही व्यक्तिरेखा कवी रेखाटतो. दुधाळ धारा (उन्हाळ्या)नंतर हळवे (थंडीचे) दिवस येतात. हे दिवस तरटीने आपल्या शरीरावर गोंदून घेतले आहेत. डोळे भुलवणारे अबोली बोल तिने फुले म्हणून फांदीवर टिपले आहेत. येता जाता तिचे अस्तित्व मानवी पायांना थांबवणारे आहे कारण या तरटीला काटे आहेत. ही तरटी आपल्याकडे कोणीतरी पाहिल म्हणून वाटेकडे डोळे लावते. पण तिच्याकडे कोणाचेच लक्ष जात नाही की तिला कोणाचे प्रेम मिळत नाही. ती वांझपणाचे उन्हाळ श्वास आपल्या पर्णहीन फांदीत साठवून घेते. कारण उन्हाळ्यात तिला पाने नसतात. पण उन्हाळ्याची उन्हे तिला सोसेनाशी होतात तेंव्हा-

तरटीच्या काट्यांचीच / फुले होतात![४०]

तिच्या वेदनेचा अतिरेक होतो. उन्हाळ्यात त्यावेळी तिच्या काट्यांचीच फुले होतात. एका उपेक्षित झाडाची व्यक्तिरेखा कवी येथे चितारतो.

या तीन वृक्षांच्या व्यक्तिरेखांसारखे चित्रण कवी येथे करतो हे करत असताना कवीने तीन वेगवेगळ्या मानवी वृत्तींचे आरोप या झाडांवर केले आहेत. हादगा, हळव्या शेवरी उच्छृंकल शृंगाराचे तर *तरटी* उपेक्षित वृत्तीचे प्रतिक मानले आहे. या तीन कवितांतून कवीच्या सूक्ष्म निरीक्षणाचा प्रत्यय येतो. ही व्यक्तिचित्रे पाहिली की बालकवींच्या *औदुंबर* या काव्याची आठवण होते.

झाडे-निसर्ग सहसंबंध

झाडे ही निसर्गाचाच एक घटक आहेत. त्यांचा एकूण जीवनक्रम या निसर्गातच चालतो. त्यामुळे साहजिकच त्यांचा या निसर्गाशी वेगवेगळ्या नात्यांनी संबंध येतो. या झाडे-निसर्ग सहसंबंधाचे चित्रणही नारायण सुमंत यांची कविता करते.

कवीला वाटते हंगामानी झाडे बदलत नाहीत तर झाडेच हंगाम बदलतात. प्रत्येक हंगामात पक्षी विशिष्ठ प्रदेशात झाडावर निवास करतात म्हणून कवी म्हणतो-

झाडावर हंगामच, / विसरून जातात- / पाखरांचे अस्थायी मुक्काम![४१]

झाडे वाढतात उन्हातून, काट्याकुट्यांना समजून घेत. आसपासच्या दाटीतून आपली नव्हाळी वाढवतात. अशा बहरलेल्या झाडांना वेली विळखीत जातात. फांदी फांदीतील उभार डोळे वेलींच्या बोलीला जाणून घेतात. झाडे उन्मादात वाढतात. वेलींना झिंगवितात. हळूहळू वेली झाडांच्या खोडांना करकचतात. हळूहळू बहर पिऊन-

वेली पिकवून टाकतात / झाडांना[४२]

सूर्य आभाळ उतरून जातो त्यावेळी चंद्र माळाच्या पायतळी उतरतो. तेंव्हा साहजिकच झाडही उन्हातून चांदण्यात उतरते. त्यावेळी त्याला स्पर्शलेले नव्हाळ वेलींचे मेंदीसारखे गंध आठवतात. झाडांतून खोडाकडे एक अधोधारा प्रवासते. भोवतालच्या भर पुनव रान वा-यात, झाडाच्या मनात, धगधगता चंद्रजाळ निर्माण होतो. झाड या वातावरणात एका समाधी अवस्थेत जाते. सकाळी पाखरांच्या फडफडाटानेही झाडाला सकाळ जाणवत नाही. सूर्य आभाळात उतरतो-

आणि / पायतळी उन्हाळतो माळ[४३]

तेंव्हा झाडे या समाधी अवस्थेतून बाहेर पडून पुन्हा उन्हात जातात.

झाड जेंव्हा चांदणबनात उतरते व आपली दमदार पुष्पमुळे रोवते. तेंव्हा चंद्रप्रकाशही शितल होऊ लागतो. पानाफुलातून चांदण्याचा कल्लोळ निर्माण होतो व हा कल्लोळ हळूहळू जंगलभर पसरत जातो. जंगलभर पसरून क्षितिजाच्या पल्याडही जातो. मग झाडाचे हे रुप चंद्राला इतके आवडते की,

चंद्रही मग / भरदिवसा येतो घर[४४]

झाडांचे समोवतालच्या निसर्गाशी असणारे नाते कवी चित्रित करताना दिसतो. झाडाचे रुप निसर्गालाही मोहविणारे असते असे दिसून येते.

कलम

मानवाने कलमाद्वारे झाडाच्या नैसर्गिक प्रकृतीत बदल घडवून आणला. आपल्या सोयीनुसार, इच्छेनुसार फुले-फळे यांचे उत्पादन झाडाद्वारे करण्यासाठी झाडावर मानवाने कलम करण्याची पद्धती शोधून काढली. या कलमाचीही काही वैशिष्ट्ये आहेत. त्याचे वेगळेपण आहे. त्याच्यात काही दोषही आहेत. या सर्वांचा उहापोह आपल्या कवितेत नारायण सुमंत करतात.

कवी म्हणतो कलम झाडावर होत नाही तर कलम रोपांवर होते. कलमाचा परिणाम झाडाच्या मुळावर होत नाही. कलम फांदीवर होते. म्हणजेच कलमाने संपूर्ण झाडाची रचना बदलत नाही तर-

परंपरागत खोडाचा बाण टाळून / कलमीपण उतरते फळावर[४५]

तरीही कवीला वाटते कलमानेही बरेच काही झाडावर घडवता येते. अर्थात कलम जंगलावर अथवा जंगलपणावर क रता येत नाही. कलम करण्यासाठी झाडाझाडातील जंगलीपण शोधावे लागते. कलम करण्यासाठी हुकमी डोळा भेटाया लागतो. एखाद्या झाडावर हुकमी डोळ्याचे कलम करूनही अशा एक दोन झाडांनी जंगल कलमी होत नाही. कलमांच्या कार्यक्रमांनी जंगल बदलता येत नाही. ज्याप्रमाणे अश्वासनाने दंगल थांबत नाही त्याचप्रमाणे कलमाने जंगल बदलता येत नाही. जर जंगल कलमी करावयाचे असेल तर झाडांना आभाळ हातानी दिलासावे आणि या झाडातील तू-मी पण खुडून काढावे तेंव्हाच-

नवे डोळे रुजताना / जंगल होते कलमी[४६]

पुन्हा एकदा कलमाचा विचार करताना कवी म्हणतो कलम मातीवर होत नाही. कलम आभाळावर अथवा पावसावरही होत नाही. त्याचप्रमाणे कलम बीजावर अथवा झाडावर किंवा झाडपणावरही होत नाही. कलमासाठी उच्च वाणाचा मातृवृक्ष लागतो. ज्याच्या तनामनात आभाळाला वेधण्याचे लक्ष असते जो बिलगतो प्रत्येक-

काटेपणाला, करंटेपणाला / फूलपणाबाबतीत दक्ष[४७]

खरे तर झाडाचे खरे रुप जंगलातच असते. तेथेच झाडे मोठ्या प्रमाणात असतात. पण कलम करत असताना जंगलाच्या हद्दीबाहेर कलमीकरण करण्यात येते ही एक फसवणूक आहे. कलमास योग्य अशा झाडाचेच कलमीकरण केले जाते. गावरान उंडगळ जातींनाच कलमाचे दान द्यावे लागते. म्हणूनच कवी म्हणतो-

मूठभर उद्यान वृक्षांऐवजी / दंडकारण्य कलमी व्हावे[४८]

मानवाने आपल्या जीभेचे चोचले पुरविण्यासाठी झाडाच्या नैसर्गिकपणात अनेक बदल केले. आपल्या सोईनुसार व आवडीनुसार हे बदल केले आणि झाडातील नैसर्गिकपणा उद्ध्वस्त केला. फळ म्हटले की, बीज असणार. पण मानवाने झाडाला कलम करून निर्बीज फळे निर्माण केली. दिखाऊ चमकदार रंगासाठी, गोड मधुर गरांसाठी आपल्या जीभेचे चोचले पूर्ण करण्यासाठी झाडपरंपरेचे स्वयंभूपणाचे समूळ उच्चाटन मानवाने केले. झाडाची भव्यता, गर्दता, पुष्टता आणि कणखरता टाळून दिखाऊ झाडे व फळे मानवाने कलमीकरणातून निर्माण केली. झाडांच्या सृजनशील हिर्व्या पिढ्यांचे जाणीवपूर्वक नपुंसकीकरण मानवाने केले त्यापाठीमागे आहे-

निर्बीज फळपण / एक कलमीकरण [४९]

तरीही कवीला वाटते संपूर्ण वनप्रदेशावर कलमीपण उतरणे अवघड असते. दर चौरस जंगली इंचावरील कलमाने डेरेदार सावलीपण हटवणे. जुनाट झाडांची हटवादी खोडे प्रसवीत राहातात. आपला विस्तार त्यांच्या पायाखालीची नवी कलमी झाडे या जंगली झाडांच्या विस्ताराखाली दबून जातात. पूर्व दिशेच्या मंद वा-यानेही या जंगली झाडांची पाने फडफडत नाहीत. माती आडच्या राक्षसी मुळांचीही या कलमी झाडांसाठी मने विरघळत नाहीत. मागील पिढ्यांच्या झाडांची झालेली दाटी हटत नाही. त्यामुळे, दरवर्षी कलमी रोपटी पानगळीच्या हंगामात बुजून मरतात. या जुन्या जंगली झाडांच्या करकरीतून वणवा पेटला तर मात्र हे सावलीपण हटत जाते. व त्यातूनच पुढे-

आणि राखेच्या दर एक ढिगातून / उमलून येते कलमीपण[५०]

जंगलाचे कलमीकरण झाले आणि झाडांच्या बाबतीत सर्व जुनी परंपरा मोडून पडली व नवे नियम झाले त्यामुळे, जंगलाला मिळालेल्या सर्व वरदानालाही खुजेपणा आला. मातीच्या मातीपणाही झाडे विसरली,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

व कलमीपणाच्या ओघात जंगलाचे वर्गीकरण झाले. त्याचबरोबर स्वाभाविकपणे जंगलाचे तुकडे झाले. बुजुर्ग झाडांचेही म्हणणे पडले की, जंगलाच्या कलमीपणासाठी विभाग पाडणे गरजेचे आहे. त्यामुळे जंगलामध्ये गटतट झाले. या गटतटामुळेच अंतस्थ मुळांची दंगल सुरु झाली. वृक्षांना तोडूनच रेखलेले बांध, ओळीत मांडलेले धोंडे झाडामार्फतच कु-हाडींना पुरविलेले दांडे यामुळे या गटातटाला मदत झाली. म्हणून कवीला वाटते सांगता येत नाही पश्चिमेच्या एखाद्या साध्या भोव-यानेही बेटामागून बेट उखडीत जंगल उद्ध्वस्त होईल. आणि म्हणूनच कवीला भिती वाटते-

कलमीपणाच्या नादात / पायतळीची मातीही जाईल[५१]

या कवितेत झाडांच्या बाबतीत कवी बोलत असला तरी ध्वन्यर्थाने देशातील जातीयता त्यामुळे पडलेले गटतट याबद्दलही बोलत असावा असे वाटत राहते. या गटतटामुळे एखाद्या परकीय आक्रमणापुढे देश गुलाम बनेल अशी भितीही कवीला वाटते.

काही कवितांमधून कलम, कलमी वृक्ष, कलमीपणाचे दोष, कलमीपणामुळे झाडांना येणारे नपुंसकपण, कलमीपणामुळे जंगल उद्ध्वस्त होण्याचा धोका या सर्व बाबींवर प्रकाश टाकताना कवी दिसतो. झाडांचा विचार करीत असताना कलमीपणाचाही विचार करणे अपरिहार्य आहे त्यामुळे नारायण सुमंत या कलमीपणावरही प्रकाश टाकताना दिसतात.

बागा

मानवाने शहरे वसवली. शहरामध्ये लोकसंख्या वाढली त्यामुळे साहजिकच तेथील वृक्षांची संख्या कमी झाली. परंतु मानवाचा वृक्षांशी असणारा ऋणानुबंध व वृक्षांचे नैसर्गिक महत्व यामुळे मानवाला वृक्षांची गरज भासू लागली. त्यातूनच वृक्षांच्या निर्मितीची वेगळी पद्धत अस्तित्वात आली. ज्याला बागा असे म्हणतात. या बागेतील वृक्षांचेही वेगळेपण असते. हे वेगळेपण नारायण सुमंत आपल्या कवितेत रेखाटताना दिसतात.

झाडे नैसर्गिकपणे वाढली व जन्मली की त्याच्या या विकासामध्ये एक वेगळेपण असते. हीच झाडे शहरामधील बागेतही वाढतात, बहरतात. स्वत:च्या झाडपणासाठी सभोवतालचे कुंपणही विसरतात. सप्ताहातून एकदा स्वत:ला छाटून घेतात. मानवाने दिलेल्या आकारात नटून राहतात. शहरातील धूळ, धूर, गजबजाटात लावलेल्या जागीच ओळीने थांबतात. मालक खतपाणी घालतो या लाचारीपोटी त्याला फुले

तोडू देतात. लोकांना चांगले दिसावे म्हणून बहरतात, नटतात. हे त्यांचे बहरणे हुकमी असते असे कवीला वाटते. म्हणजेच कृत्रिमपणे ते नटतात. या झाडांच्या वाढीमध्येही एक साचेबंदपणा असतो. नैसर्गिकता नसते. असे बरेच दु:ख बागेतील झाडांच्या हिरवेपणात लपलेले असते तरीही-

झाडे उत्सवतातच / बागपणातही[५२]

बागपणात रोपांना एका जागेतून उपटून दुस-या जागेत लावले जाते. या स्थलांतराचा परिणाम या रोपांवर होत असतो. पण तरीही कवीला वाटते आपला तजेलपणा या रोपांनी तोडू नये. बागपणातही कुंपणे तोडीत आपले झाडपण जपत राहावे, वाढावे जिद्दीने. आपला विस्तार इतका करावा की,

कापून आकारबद्ध / करणा-यांना / समजून याव्यात चुका[५३]

बागेतील झाडांना जंगलातील झाडांसारखा कणखरपणा नाही. नैसर्गिक जंगले कशी घनगर्द, ताठ, कणखर होती. त्यांच्या कणखरपणात बलदंड मुळांचाही वाटा महत्वाचा असेल. पण अलीकडे एका झुळकीनेही जंगल उलथे पालथे होते. अलीकडे जंगलाचा रंगच बदलतोय. झाडांच्या जथ्यांना हिरवेपणा नकोसा वाटतो. फुला फळांचे रक्षण करण्यासाठी खोड कुंपण मागते. फांद्याना बहर पेलेनासा होतोय, म्हणून त्यांना टेकू द्यावा लागतो. ही झाडे आपले सौंदर्य फूलपण विकू पाहत आहेत. या अशा दुबळ्या झाडांना कोणीतरी फसून जंगल म्हणेल. पण या आहेत बागा किंवा मळे. या बागांप्रमाणेच-

अशीच हिरवी कंच दिसतात / टारफुला..... बांडगुळे.....[५४]

झाडे जंगलातून बागेमध्ये स्थलांतरीत होतात, त्यावेळेपासून ती बागाळत जातात. त्रयस्थतेने रानपाखरांना फांद्याही आसरा नाकारतात. आजूबाजूच्या रंगबेरंगी दुनियेचा वारा झाडांना लागतो. आपली नवती पालवी छाटली जात असताना जराही झाडे बंड करीत नाहीत. जंगलातील झाडे मात्र सोसाट्याचे वारे थोपवीत भोवतालच्या पक्ष्यांच्या चोचीसाठी मेघांना खेचून आणतात. नवती पालवी सांभाळत फूल फांद्यांचा विस्तार करतात. उर्ध्वगामी दिशा आणि प्रकाशलक्षी फुटणे, उत्तुंगपणाचा ध्यास व आकारमुक्त ताटणे ही आपली झाडपणाची वैशिष्ट्ये बागाळलेली झाडे विसरून जातात. बागपण अंगीकारल्यानंतर रांगेत उभारतात व झाडपणासाठी आपल्या सर्व स्वातंत्र्याचे हुतात्मे पत्करतात. जुन्या जंगलपणाच्या आठवणी उगाळत राहतात.

तरीही झाडाला आदिमपणच भावते. बागपण मात्र झाडाला खुपते. बागपणात झाडे बंडाळत जातात. आपल्या आकाराच्या बाबतीत असहकार करतात. बागपणात माती पाण्याचे विकार झाडाला जडतात. त्यामुळे, साहजिकच झाडाला एक प्रकारचा दुबळेपणा येतो त्याचमुळे त्यांच्यावर-

लष्करी आळ्यांचे / झाडांवर होतात वार[५५]

झाडाच्या या वेगळ्या रुपाचा विचार कवी करतो. बागपणात झाडाला येणारे दुबळेपण, त्यांच्या स्वातंत्र्यावर पडणारा घाला, त्यांच्या नैसर्गिक वृत्तीवर पडणारी बंधने या सर्वांचा विचार बागपणातील झाडातील या कवितांत कवी करतो.

झाडांच्या वेदना

झाडांचे वर्णन कवी करतो त्याचप्रमाणे झाडांच्या वेदना व अंतवर्णनही कवी करतो. झाडे ही निसर्गाचा घटक असल्यामुळे या निसर्गात जीवनक्रम चालविताना त्यांना काही वेदना सहन कराव्या लागतात. त्यांचा अंत वेगवेगळ्या कारणांनी होतो याचे वर्णन कवी येथे करतो.

झाडांना आपला जीवनक्रम व्यथित करीत असताना त्यांची अनेकवेळा घुसमट होते. तरीही झाडे नि:शंक केविलवाणी असतात. बहर भोवती फुलत असताना देखील पानगळीला सामोरे जावे लागते. भोवतालच्या हिरव्याकंच वेलसंभाराकडे सहेतुक दुर्लक्ष करावे लागते. काष्ठांतरी हिरवेपणाची मुळांतरी घुसमट होते. त्याहूनही प्राणांतिक वेदना झाडाला होतात. आलेल्या वा-याच्या लहरीखातर फांद्या-पानांची सळसळ करावी लागते. मुळांच्या अंतरी अन्नद्रव्ये, पाणी त्यासाठी होणारी घुसमट दाबून बहर हक्काने फुलवावा लागतो. या सर्वच ठिकाणी झाडाला वेदना, घुसमट होत असते तरीही झाडाची अवस्था

केविलवाणे / झाडाचे नि:शब्द होणे[५६]

काहीतरी देणा-याला काहीतरी भोगावे लागते. या न्यायाने वृक्ष सर्वांना सावली देतो. त्यामुळे साहजिकच झाडाला ऊन टाळता येत नाही. त्यामुळे झाडाला स्वच्छंदीपणे जीवनक्रम व्यथित करता येत नाही. आजच्या कळ्यांची उद्याच्या फूलपणासाठी झाडाला चिंता करावी लागते. उद्याच्या फळपणासाठी फूलांचा ध्यास घ्यावा लागतो. फळपणाच्या पाठीमागे बीजांची निर्मिती व या बीज निर्मितीतून पुढील विस्ताराचा हव्यास आपल्या अंतरी ठेवावा लागतो. जरी झाडाने या त्रासातून मुक्त व्हायचे ठरविले तर

त्याला ते शक्य असते का? झाडाला आपल्याला आलेल्या कळ्या-फुलांना खुडून टाकता येते का? झाडाच्या ऐन बहरातच दूरदेशचे पक्षी त्याच्यावर उतरतात, व झाडाचा बहर अंगावर कोंदून घेतात. या--यामुळे फांद्या फडफडतात, सळसळतात, पाने हळहळतात, फुले चुळबुळतात, तरीही झाडाला या सर्व गोष्टी सहन कराव्या लागतात. आलेल्या प्रत्येक परिस्थितीला तोंड द्यावे लागते म्हणूनच कवी म्हणतो-

दिल्या खडकाला का टाकून जाता येते / झाडांना तरी कुठे, गाणे गाता येते! [५७]

मानवाला काटेरी झुडुपांचा उपयोग नसतो म्हणून मानव या झुडुपांचे संगोपन करीत नाही. कवी येथे काटेरी झुडुपांच्या भावना व्यक्त करताना दिसतो. कवी म्हणतो काटेरी झाडांनाही समजून घ्यावे थोडेसे. त्यांनाही सलत असतेच काटेपण कोठेतरी. त्यांच्या खोलवर फूलपणात काटेरी झुडुपांचे काटेपण असते. भोवतालच्या रणरणत्या उन्हात. (ही झुडुपे शक्यतो उष्ण कटिबंधात असतात), अपु-या पावसात, उदास आभाळात, उजाड माळरानात काटेरी झुडुपांना आपला विस्तार करावा लागतो. अशा झाडांनाही मानवाने खळे रेखावे, पाणी घालावे. हलकेच हिरवेपणाची गाणी ऐकवावीत. त्यामुळे या काटेरी झुडुपांच्या बोच--या वेदना हळूहळू विरघळून जातील आणि

झुडुपा झुडुपांवर..... / काट्यांचीच फुले होतात [५८]

हिरवेपणाच्या ध्यासाने झाडाच्या मुळ्या विस्तारतात. त्यांना या ध्यासापोटी त्यांच्याकडून काही गुन्हेही घडतात. वाळवीची संगत लागते यातूनच झाडाचे पान्हे करपून जातात. त्याचमुळे विस्ताराच्या ध्यासाचा हंगाम गळून जातो. त्याचबरोबर-

पानांचाही / झाडावरून / उठून जातो मुक्काम [५९]

काळाच्या ओघात भयानकपणे होणा-या प्रदूषणाबाबत कवी येथे खंत व्यक्त करताना दिसतो. कवीला वाटते झाडे मरण्याइतपत प्रदूषण नाही. तोपर्यंत आपण सावध व्हायला हवे. लावील तेथे झाड येत आहे तोपर्यंतच आपण सावध व्हायला हवे. सध्या जे बीज मातीत लावले जाते त्याचेच झाड येते. सांगता येत नाही उद्या कदाचित सुसंस्कारित मधुर फळांच्या बीजातूनच विषारी वनस्पतींचे काटेबंद जंगल निर्माण होईल. म्हणूनच कवी म्हणतो-

बीजे अपेक्षित प्रसक्ताहेत / तोपर्यंतच / सावध व्हायला हवे आपण [६०]

म्हणजेच कवीला झाडामध्ये जोपर्यंत सद्प्रवृत्ती आहे तोपर्यंत आपण सावध व्हायला हवे असे वाटते.

काळाच्या ओघात झाडे दुर्बल झाली आहेत. आता झाडाने कोणत्या डोळ्यातून अश्रू गाळावेत. कोणत्या डोळ्यातून झाडाला मुळी फुटावी हाही त्याच्यापुढे प्रश्न आहे. कारण त्या झाडाचा विस्तार व्हावा अशी त्याची स्थिती राहिली नाही. त्या झाडाची पानापानाची पडझड सुरु झाली आहे. फांद्यांच्या पिचण्याने सालींची धडपड सुरु आहे. जंतूही झाडांचे तडे, मेगा हुडकून त्यात घुसत आहेत. या प्रत्येक हेलकाव्याने झाडाचे तंतू तंतू तुटत चालले आहेत. जेंव्हा झाडाला वादळाची तहान होती तेंव्हा साधी झुळुकही आली नाही. आज मुळे मातीत शोधात आहेत वाचण्यासाठी काही मिळते का म्हणून. आता या खोडाला लपेटावे असे काही उरले नाही. दररोज झाडाला मावळतीचा तांबडा रंग थरकापून टाकतो. कारण झाडाला उद्याचा सूर्य पाहता येईल की नाही हे सांगता येत नाही. झाडाचा आता पूर्ण विस्तार झाला आहे. आता मात्र त्याला आपले निसर्गातील इतर घटकांशी दूरचे नाते होते हे समजून चुकले आहे. तरीही झाडाच्या मुळांना तळाची माती सोडू वाटत नाही. झाडाच्या आता या केविलवाण्या अवस्थेत कोणी वनमाळी या झाडाला पुन्हा नवसंजीवनी देईल का हा प्रश्न आहे. या झाडाच्या केविलवाण्या अवस्थेमुळेच कवी म्हणतो-

आता कोणत्या म्हणून / डोळ्यातून अश्रू गाळी?[६१]

झाडालाही वाटत आहे आपला अंत व्हावा. या अरण्यातील प्रत्येक झाडाच्या मनांतून व पानातूनही उन्हे उतरली आहेत. पाऊसकाळ उलटून गेला. त्यानंतर हिवाळाही परतला. अगोदरच विस्कटलेल्या अरण्यातून उन्हे प्रत्येक झाडाच्या मना-पानातून उतरली आहेत. या तीव्र उन्हाच्या फौजा झाडाची पाने ओरबडून काढून झाडाला निष्पर्ण निष्कांचन करीत आहेत. रोजची चूल पेटविण्यासाठी हा पाचोळा जमत आहे. झाडासह वेलींच्याही अंगावर या उन्हाचे वळ उठत आहेत. आता या अरण्याला एकच ध्यास एखादा रुबाबदार आझाद हिंद जंगल निरीक्षण करण्यासाठी येईल आणि सिगार शिलगावीत सहज टिचकीने अंगार भिरकावून देईल. उन्हाने धपापत्या पाचोळ्याच्याही मनात केंव्हापासून आहे की या उन्हाच्या फौजांना भाजून काढावे. या अरण्यातील झाडांच्या मनातही हा विचार केंव्हापासून आहे म्हणूनच-

या अरण्यात उन्हे केंव्हापासूनची उतरलेली / प्रत्येक मनापानातून[६२]

जसे झाडांच्या मनात जंगलपण उठावे असे आहे. तसेच मानवही मोठ्या प्रमाणात जंगलतोड करीत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या परिणामामुळे जंगल तोड मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचे दर्शन या कवितेत कवी घडविताना दिसतो. बीजे पाऊस प्रदेशाकडे सरकत राहतात. पावसामुळे उगवत राहतात. जागेच्या कमतरतेमुळे रस्त्याच्या कडेला दाटीवाटीने उगवत राहतात. पूर्वीची जंगलपणातली मुळांची परंपरागत घनगर्द संस्कृती झाडे फक्त आठवत राहतात. आपली ही घनगर्द संस्कृती नष्ट करण्या-या मानवाच्या रस्त्यांवर जंगल उभारण्याचे मनातून ठरवत राहतात. पण उजाडताच पक्षी त्यांना घरट्यासह सोडून जातात त्याचवेळी,

झेपावलेले असते त्यांच्या दिशेने / फुटपट्टीसह[६३]

ही जंगलतोड अलीकडे भलतीच वाढली आहे. प्रत्येक कु-हाड हात (जंगलतोड करणारी व्यक्ती) झाडे जुनी झाली या नायाखाली जंगल तोड करताना आढळतो. कवीचा आक्षेप जंगलतोडी बद्दल नाही. तर नवीन कोंभा-यासह फुटलेल्या नवीन झाडांचीही जंगल तोड होत राहते याबद्दल कवीला खंत वाटते. या पश्चिमी वा-यामुळे प्रदूषण होत आहे. हे प्रदूषण टाळावे म्हणून कोणी प्रयत्नही करीत नाहीत. त्यातच ही जंगलतोड होत आहे. म्हणून कवीला भिती वाटत आहे की पुढे हा सर्वच प्रदेश प्रदूषण व जंगल तोड यामुळे ओसाड होईल म्हणून कवी म्हणतो-

पुढीलांच्या ओसाडीची स्वप्ने / कुणी पाहतो आहे काय?[६४]

झाडाचा नाश फक्त प्रदूषण व जंगलतोडीमुळेच होत नाही तर झाड ज्या मातीवर सर्वस्वी अवलंबून असतात ती माती जर निकस झाली तर झाडाचे मरणच होते. रुजल्या बीजाच्या अजाण वाढीत अंकुर वेदना सहन करून आपला विस्तार करत राहते जर माती निकस झाली तर झाडाला जिवंत मरण सहन करावे लागते. अशा निकस मातीत जन्मजात अशक्त खोड निर्माण होतात. डोळ्यांना अंधपण येते. पाना-पेराच्या वाढीत निसत्वपण वाढत जाते. या मातीच्या निकसपणाबरोबर उन्हाळ्याच्या झळा या झाडाला सहन कराव्या लागतात. त्याचप्रमाणे मृतप्राय खडकाशी पाण्यासाठी टकरा द्याव्या लागतात. त्या खडकाखाली पाण्याचे गूढ तळे त्यातच उतरताना कोवळी हळवीमुळे होरपळून जातात. यातून उगवून आलेल्या झाडांची चराऊ कळपाच्या प्राण्याकडून सुटका होत नाही. या सर्व संकटांमुळे झाडाला खुडुपपणाचे स्वरुप प्राप्त होते व झाड होणे हे एक स्वप्नच राहते. या सर्वांच्या मुळाशी असते-

मातीचे निकसपण / झाडांचे जिवंत मरण[६५]

अशा प्रकारे कवी झाडांच्या वेदनांचे चित्रण आपल्या कवितेत करतो.

झाडांचे महात्म्य

कवी नारायण सुमंत झाडांशी पूर्णपणे एकरूप झाल्यामुळे त्यांना झाडाचे मोठेपण, त्याची उदारता, त्याचे सर्वसमावेशकपण, त्याची सहनशीलता या सर्व गुणांची जाणीव आहे. त्याचमुळे कवी झाडाच्या या सर्व गुणांची आपल्या कवितेमध्ये अभिव्यक्ती करताना दिसतात.

झाडाचे मोठेपण कळण्यासाठी झाडाशी एकरूप व्हावे लागते. झाड स्वत: ऊन सोसून दुस-याला सावली देते. हे कळण्यासाठी मानवाने स्वत: ऊनात निथळून जावे त्यावेळी मानवाला झाडपण येईल. दिवसांचा हळवा पालव म्हणजेच मानवाने मोहर व्हावे म्हणजेच झाडाचे मोहरपण त्यांना कळेल. हिवाळी पहाटेत पोळवून घ्यावेत अनवाणी तळवे आणि धुक्याचा आकांत ऐकावा म्हणजे आपल्याला झाडपण कळेल. झाडपण कळणे इतके सोपे नाही. असे कित्येक अर्थ नुसत्या पानागणिक असतात आणि म्हणूनच सारे हंगाम झेलणा-यांनाच-

फक्त झाडे म्हणतात[६६]

झाडाचे मोठेपण येगळ्या पद्धतीने सांगताना कवी दिसतो. कवी म्हणतो झाडे कशी तुक्याच्या अभंगासारखी. तुकारामांच्या अभंगात अथांगता आहे, कारुण्य आहे, वात्सल्य आहे, उदारता आहे, कठोरपणा आहे, सर्वसमावेशकपणा आहे, दयाळूपणा आहे. अशीच झाडे आहेत. झाडे क्षितिज कवटाळतात, आभाळ पेलतात व हिरवीकंच अशी राहतात. त्यांच्या पानापानातून गर्द गहिरे असे ते वेद स्रवीत असावीत असे वाटते. या झाडांच्या उंचीचे मोजमाप करताना कवी म्हणतो-

झाडे आभाळउंच![६७]

झाड असेच उन्हाची तीव्रता कमी करते. झाडाच्या हिरवेपणात उन्हाचे फक्त शिंपण होते. सावली सर्वांसाठी बहाल करून तेजाची झिंग झाड घेते. झाडे वा-यातील बेसूर शोधतात. फांद्याफांद्यात त्या बेसूराची रिझवण करतात. त्याच वा-यावर पानांची बासरी फुंकून रानाला सुरांचे गोंदण बहाल करतात. जे वृक्षांचा नायनाट करतात त्या मानवांनाच झाडे आपले सर्वस्व बहाल करतात. म्हणून कवी म्हणतो-

कु-हाड हातांना फळे अर्पून / देवा फुलाचे कोंदण[६८]

झाडाला तसे कुठलेच प्रदेश नवीन नसतात त्याचप्रमाणे कोणत्याही प्रदेशातून येणारे कु-हाड हातही नवखे नसतात. त्याचप्रमाणे त्या कु-हाड हातांनी पडणारे घावही नवखे नसतात. जर मोवतालचा प्रदेश बदलला तर फक्त कु-हाडीचा धातू बदलतो. पण त्या कु-हाडीला असणारी धार मात्र ठराविकच असते. कु-हाड घावाने होणा-या वेदनेत मात्र थोडा फार बदल असतो. कारण प्रत्येक झाडाच्या सालीत थोडाफार फेरफार असतो. झाडाच्या अंतरी मात्र काष्ठधारेत सूर्यासारखे तेज असते, चंद्रासारखी शितलता असते त्याचबरोबर-

बाकी अथांग / निळे आभाळ[६९]

आभाळासारखे अथांगपण या झाडामध्ये समाविष्ट झालेले असते. या वृक्षांचे मोठेपण शब्दांत व्यक्त करण्याच्या पलीकडचे आहे. हे वृक्ष विकासाचे नाद कंठात घोळवत, दिशा कालाला धरकपवणारी वाद्ये वाजवीत, पायातले काटे दुर्लक्षित, वासनांचा बजबजाट दूर करीत, सावलीचे दान देतात. हे सावलीचे दानच कवीला शब्दांत पकडता येत नाही इतके मोठे असल्याने सहाजिकच त्या अनाहत वाद्यातल्या नादातले झाडांच्या उद्धार-यात्रेचे गूढ कवीपर्यंत पोहोचत नाही. हे वृक्ष समृद्धीचे निशाण फडकवीत चालत राहतात. आपल्या मुळांसह प्रत्येक गावामध्ये प्रसवतात. परोपकाराची बीजे प्रसवतात. या मोठेपणामुळे झाडांना कवी साष्टांग दंडवत घालतो व म्हणतो तुमच्या मुळाशी आपले प्राणपण संपावेत. त्याचप्रमाणे माझ्यातले *मी* पण कुजोत व माझ्यातले विकार आणि जडत्व झाडाच्या मुळाशीच नाहीसे होवोत, असे म्हणतो. असे असंख्य *मी* पण तुमच्या मुळाशी कुजावेत आणि त्याच्याच खतावर वृक्षांचे मानवतेपलीकडील वृक्षत्व समृध्द व्हावे ही इच्छा कवी व्यक्त करतो व आपण यापलीकडे काही करू शकत नाही कारण कवी ची झेपही-

मानवी बुध्दीझेपेत / हे वृक्षांनो[७०]

झाडांचे हे मोठेपण आहे तसेच झाडाला आपला विकास करण्यासाठी मोठ्याप्रमाणात संघर्ष करावा लागतो. त्याचेच वर्णन करताना कवी म्हणतो रखरखीत माळावरती झाडाला एकाकी रूजावं लागते. झाडाचे एक स्वयंभूपण असते. ज्याच्या मुळांना अहोरात्र पाषाणझुंज करावी लागते. त्याचप्रमाणे उलट्या दिशेला माथीच्या पानांना आजन्म झोंबणारी वादळझुंज असते. वृक्षाची सावली अपरिचित अशा थकलेल्या पांथस्थांसाठी असते. फळांसह झाडाची सर्व काष्ठसाधना पोरक्या अशा पाखरांसाठी असते. जंगलबाग

व्यतिरिक्त नांदणारे तरुणपण हे झाडांचे स्वयंभूपण असते. हे स्वयंभूपण प्रतिकूल परिस्थितीत असते म्हणून कवी म्हणतो-

रखरखीत माळावरती / एकाकी रुजवणं [७१]

मानवाला काही गोष्टी टाळता येतात. पण निसर्गाचे दिनक्रम निसर्गाला टाळता येत नाहीत. मानव गजबजाट टाळून जंगलात जाऊन तपश्चर्या करतो. पण झाडाला उन पावसाला टाळून तपश्चर्येला बसता येत नाही. वटवृक्ष असो वा पिंपळपण, अरण्यवेलींचा स्पर्श, फुलबहाराचे उन्माद जाळून वृक्षांना विरक्तीची चर्चा करता येत नाही. पानगळीमध्ये पानांना आसक्ती अडवू शकत नाही. मात्र ही झाडे विकसनशील मातीशी इमानी असतात. अरण्यातील तत्वज्ञान किंवा अरण्याची परंपरा या झाडाच्या प्रत्येक कुळात प्रसवत राहते. ही झाडे आपले अस्तित्व राखूनही एकान्त प्रसवत राहतात. तरीही झाडे वेलीच्या मिठीच्या विळख्यात सापडतात. हे सर्व मोठेपण झाडाकडे असताना त्याने झाडपण टाळावे का? माती एका बीजातून प्रचंड भव्यता प्रसवते. झाडाला स्वत:ला तपश्चर्या करता येत नसली तरी-

तपस्यांच्या माथ्यावरची / हिरवीकंच सावली [७२]

झाडे अशीच तपस्व्यासारखी निर्विकार असतात. ते समता मानतात. पक्षांची पिसं कोणतीही असोत, त्यामुळे झाडाचे अंतरंग किंवा फुलांचा रंग बदलत नाही. कावळा, कोकिळ कोणताही पक्षी असो भेदाचे आभाळ झाडापासून दूर राहते. जगामध्ये पायीचा, माथीचा असा भेद चालतो पण या व्यवहाराबद्दल झाडांना मात्र खेद नसतो. झाडाचे वागणे मात्र-

झाडतळीच गा / माणसाचे वेद । / मानवाची लीद ॥ / झाडतळी ॥४॥ [७३]

असे समतेचे असते.

अशा प्रकारे कवी नारायण सुमंत वृक्षांचे मोठेपण, त्याची भव्यता, त्याचे दयाळूपण, त्याची निर्विकार वृत्ती, त्याचे सर्वसमावेशकपण आपल्या कवितेत चितारताना दिसतात.

मानव निसर्ग सहसंबंध

संपूर्ण निसर्गाचा, या विश्वाचा विचार केल्यास मानव त्याचा एक भाग आहे. त्यामुळे या विश्वातील प्रत्येक गोष्टींशी मानवाचा संबंध येतो. मानवाचा निसर्गाशी व झाडांशी असणारा संबंध तर मानवाच्या उत्पत्तीपासून आहे. मानवाचा पूर्वज माकड हे तर पूर्णपणे झाडावरच अवलंबून होते. मानवाच्या व निसर्गाच्या सहसंबंधाचे प्रतिबिंब वेदकालीन ग्रंथापासून आधुनिक ग्रंथांपर्यंत पडले आहे. नारायण सुमंत यांच्या कवितेतही मानव-निसर्ग सहसंबंधाचे चित्रण येते. मानव-निसर्ग सहसंबंधाबरोबरच वृक्षांशी असणारे मानवाचे सनातनी नाते येथे अधोरेखीत होते.

कवी मानवाच्या उत्पत्तीपूर्वीपासूनचे झाडाशी असणारे नाते येथे प्रकट करतो. कवी म्हणतो माकडाचा माणूस झाल्यावर माणूस झाडांवरून खाली उतरला आणि त्याचे झाडाशी असणारे नाते बदलले. आतापर्यंत (म्हणजेच माकड असेपर्यंत) झाडे माकडांना सांभाळत होती. माकडांचा माणूस झाल्यानंतर मात्र माणसे झाडांना सांभाळू लागली. ज्याप्रमाणे झाडांना आदिमपणा आहे त्याप्रमाणे मानवाला असता, मानवाला जात नसती व जातीनुसार मानवाच्या वस्त्या नसत्या तर कवीला असे वाटते की,

नुसत्या लावण्यानेही / झाडे आली असती![७४]

मानव झाल्यावर झाडे सांभाळण्याची वेळ मानवावर आली पण ही झाडे सांभाळत असतानाही त्याच्याशी एकरूप झाले पाहिजे असे कवीला वाटते. म्हणून कवी म्हणतो झाडे लावण्यापूर्वी माती व्हावे हातांनी व पाणी व्हावे डोळ्यांनी. या झाडांसाठी रानोमाळ मानवाने आपले अस्तित्व पसरावे व त्या बरोबर झाडेही पसरावीत. मानवाने झाडासाठी इतके श्रम करावेत की घामाने उभे आभाळ शिंपावे. इतके कष्ट केल्यानंतर मात्र झाडे मातीत रुजतात.

आणि हातागणिक / रसदार फळे येतात![७५]

अशा प्रकारे झाडाशी एकरुप झाले की झाडे आपणास कळू लागतात; आणि झाडांच्या नेहमी सान्निध्यात असणा-या व झाडांना चांगले ओळखणा-या पक्षांनाही कळते की झाडांशी एकरुप झालेला माणूस तो हाच आहे. झाडांशी इतके एकरुप झाल्यावर पक्षांच्या जाती कळत नाहीत. (कारण झाड

पक्ष्यांतील भेदभाव मानीत नाही.) त्यावेळी मानवाच्या रोमारोमावर झाडांच्याच पालव्या येतात आणि आपणाला -

तेंव्हापासून- / झाडे समजू लागली!

झाडे वाढवण्यासाठी झाडांशी एकरुप व्हावे, कष्ट घ्यावे असे कवीला वाटते. म्हणून कवी म्हणतो बीजे आपल्या घामात भिजवावीत. झाडे अंगणात वाढवावीत. झाडे आपल्या वस्तीत सांभाळावीत. त्याचप्रमाणे झाडे मनात फुलवावीत. मानवाला झाडाची पाने फुले आवडतात त्याचप्रमाणे झाडाची सावली-निवारा आवडतो असे हळूहळू-

माणूस रुजवा झाडपणात [७७]

माणूस कितीही झाडात रुजला तरी माणसाने कितीही झाडाचा सांभाळ केला तरी, झाडाला स्वत:चे असे स्वयंभूपण असते. म्हणून कवी म्हणतो मी जपलेल्या झाडांना पाणी घालताना जाणवाले की झाडे मी जपूनही ती माझी नाहीत. पाणी ज्याप्रमाणे स्वयंभू असते त्याचप्रमाणे झाडेही स्वयंभू आहेत. त्यांची सावली ही स्वयंभू आहे. लोकांना मात्र वेगळेच वाटते म्हणून कवी म्हणतो-

इतरांना काय माहीत / झाडे माझी नाहीत! [७८]

मानवाचे व झाडाचे नाते इतके सनातनी असले तरी, व मानव झाडांना सांभाळत असला तरी, मानवच वृक्षांची सर्वात जास्त तोड करतो हा इतिहास आहे. म्हणून कवी म्हणतो की झाडे एकच गुन्हा करतात तो म्हणजे आभाळभर हात (फांद्यारुपी) पसरतात व आयुष्यभर आपल्याबरोबर सर्वांसाठी पाऊस मागतात व त्या पावसावरच पोसतात वाढतात आणि-

तोडणा-यांच्या चुलीसाठी- / पानोपानी वाढत जातात! [७९]

जरी मानव तोड करीत असला तरी झाडे मात्र मानवालाच नव्हे तर कोणालाच दूर लोटत नाहीत. आभाळभर फांद्यारुपी हात पसरून आयुष्यभर पावसासाठी आभाळाला पान्हा फोडतात. यामध्ये झाडे काहीही गुन्हा करीत नाहीत पण त्यांच्या दुर्दैवाने त्यांचा हा गुन्हा ठरतो. त्यांची पावसावर वाढ झाल्यानंतर त्यांची मानवाकडून तोड होते तरीही झाडे-

तोडणा-यांच्या चुलीजवळचा / आपलाच मानतात तान्हा [८०]

पण मानव मात्र झाडाचे महत्व जाणून आहे तसा कवीही आहे. म्हणून कवी म्हणतो रुजण्याजोगे रान पाहून झाडे लावीत जावे. कारण झाडे सांभाळणा-यांना सावली देण्याचे काम झाडे करतात. त्याचप्रमाणे अनवाणी पायांपुढेही सावली झाडे पेरतात. आपल्याला कोणी लावले हेही झाडे विसरून जातात व पानोपानी वाढत जातात व पेरणा-याच्या वंशासाठी दिवा बनण्याचे कामही झाडे करतात. ज्या मानवाला स्वत:ला आयुष्यात फुलता आले नाही तरी त्याने झाडे फुलवावीत, म्हणूनच कवी म्हणतो-

रुजण्याजोगे रान पाहून / लावीत जावे झाडे! [८१]

मानवाने झाडे लावलीत, सांभाळलीत तरी झाडांचे सर्वच रुप त्याला कळेल असेही नाही. झाडांना कवितेसाठी म्हणून जरी विचारले तरीही झाडे हंगामाची गाणी सांगत नाहीत. झाडांना कळणारी पाखरांची भाषा, मोहरातील उखाणे, पावसामध्ये भिजण्याची मज्जा, पाणझाडीची हिरवीगार नशा, पहाटदवांत पानावर उमटणा-या दिशेची चिन्हे यातील एकही गोष्ट झाडे मानवाला सांगत नाहीत व मानवाला साहजिकच यातील काही कळत नाही. जाणीवपूर्वक झाडे हे अजाणपण जपतात कारण झाडे-

अजून विसरत नाहीत / माझ्या नजरेतील माणूसपण [८२]

झाडाला एक अपरिहार्य गोष्ट असते ती म्हणजे उन्हाचा सहवास. उन्हाच्या सहवासामुळे साहजिकच झाडाच्या पायतळी सावली येते. या सावलीवरून झाडाची जात जर ठरवित गेलो तर झाडाच्या बाबतीत तो संकुचित विचार ठरतो. मग तो कोकणी ताड असो वा वटवृक्ष असो या झाडांच्या सावलीचा उपयोग सर्वांना होतो. या झाडाच्या सावलीत कोणी बसून व्यसन करावे तर कोणी विरक्ती पत्करून तपश्चर्या करावी. हे सर्व घडते झाडाच्या सावलीच्या बाबतीतच. पण झाडाच्या पायतळी पडलेल्या सावली खेरीज खरे-

झाडपण / माथ्यावरच उरते [८३]

ही जमीन खरे तर कोणाच्याही मालकीची नाही पण तरीही जमिनीची मालकी ठरविली जाते. त्याचप्रमाणे झाडाचीही मालकी ठरविली जाते. हद्दी नक्की झाल्यानंतर पावसापाण्यानुसार झाडे उगवतात. अशी येणारी झाडे ही बहुतेक काटयाची व क्वचित फळांची असतात. हंगामानुसार यांना फूलपण येते. पुढे माणसामाणसातील तेढ वाढत जाते. हद्दीचे बांध होतात बांधातून बांधे होतात या तेढातून बांध फुटू

पाहतात. झाडे कसोशीने बांध जपतात. हळूहळू मानवातील तेढ वाढते व हाताची जागा हत्यारे घेतात व झाडांची तोड केली जाते

आणि हद्दी पोरक्या होताना..... / झाडे हद्दपार होतात[८४]

काही वेळेला झाडाचे महत्व दुस-यालाच मिळते. मानव झाडाचे मोठेपण जाणून त्याला हळदी कुंकू वाहतो. पण हे हळदी कुंकू झाडाला वाहताना ते झाडाच्या पायतळीच्या दगडावर पडते. मग झाड फक्त त्या दगडाच्या सावलीसाठी उपयोगी ठरते.

आणि / दगडालाच देवपण येते![८५]

यातूनच कवीला सांगावयाचे आहे की प्राचीन काळी मानव महाभूतांना देव मानत होता त्याची पूजा करीत होता. निसर्गातील घटक झाडे, सूर्य, चंद्र, काही प्राणी यांची पूजा करीत होता पण त्यातूनच पुढे अनिष्ठ प्रथा पडत गेल्या. उदा. वृक्षपूजनातून वटसावित्रीच्या वेळी वडाची पूजा करण्यासारखी अनिष्ठ प्रथा पडत गेली.

वृक्षांचे आणि मानवाचे ज्याप्रमाणे सहसंबंध आहेत त्याचप्रमाणे एकूणच निसर्गाशी व रानाशी मानवाचा सहसंबंध आहे. चुकल्या व्यक्तीला गावकुस हाकलून देते पण वाट चुकलेल्या व्यक्तीला रान आसरा देते. गावामध्ये फक्त पैसा आणि भाकरीवरच व्यवहार चालतो मात्र हिरव्या रानात फक्त मायेचे पाखरच असते. झाड प्रत्येकाची सावली होते तर आभाळ प्रत्येकाला पांघरुण घालते. गावकुसात एखादी गोष्ट त्रासदायक ठरते ती या रानात त्रासदायक ठरत नाही. अशा प्रकारे शेत हे गावकुसाहून थोर असते. त्याची महती गाताना कवी म्हणतो-

घाव घालणा-या मुखी / ऊस देतूया साखर

अशा प्रकारे नाश करणा-याच्या तोंडीही साखर देतो. या कवितेत ग्रामसंस्कृती व लोकसंस्कृतीचेही दर्शन घडते.

माणसाची अशीच पावसाकडे असणारी ओढही सनातनी आहे. शेतामध्ये *बी* पेरल्यानंतर शेतक--याचा जीव त्या तासातल्या पोपटी अंकुरासाठी तुटतो. त्या अंकुरासाठी जीव तुटतो की त्यावर आपलं घर

अवलंबून आहे म्हणून जीव तुटतो हे कळत नाही. अगदी मृग निघाला म्हटले की डोळे आभाळाला खिळतात ते थेट साईसवाती पर्यंत. असे का होते हे सगळे न कळण्यापलिकडचे असते ज्याप्रमाणे-

आंबट-ओलीवरती / सोडलेल्या बियाणांच्या / भवितव्याइतके![८७]

नुकतीच पेरणी करून शेतकरी तासातून बाजूला होतो त्यावेळी त्याचे अंग घामाने भिजते. तसे त्या शेतक-याला कोकण्या तळ धरून आहे याची आशा आहे. रात्रीला का होईना देईल ठोका एखादा डाय अशी त्याला आशा आहे. त्या शेतक-याच्या मनात विचार येतो-

मातीची काय न / आपली काय / नेहमीच मरणाची हाव[८८]

मानवाचा निसर्गाशी, झाडांशी अशा प्रकारे वेगवेगळ्या पातळीवर सहसंबंध आहे. मानवाच्या निर्मितीपूर्वीपासून मानवाचे या वृक्षांशी व निसर्गाशी सहसंबंध आहे. हा सहसंबंध जसा भावनिक आहे त्याप्रमाणे वैचारिकही आहे. मानवाला निसर्गाचे झाडांचे महत्व अगदी प्राचीन काळापासून माहित आहे. त्यामुळेच अनेक वृक्ष कोणत्यातरी देवाच्या नावावर असतात व ते पूज्य मानून ते तोडले जात नाहीत. त्यातून काही अंधश्रद्धा निर्माण झाल्या असल्या तरी मानवाचे निसर्गाशी असणारे नाते समजून येते. येथेही कवी नारायण सुमंत या झाडांशी, निसर्गाशी असणारे मानवाचे नाते आपल्या कवितेत मांडताना दिसतात.

मानवी जीवनावर प्रकाश टाकणा-या कविता

नारायण सुमंत यांनी आपल्या काही कवितांमधून झाडाची प्रतिमा वापरून रुपकात्मक भाषेत मानवी जीवनावर प्रकाश टाकला आहे. मानवातील चांगलेपणा व वाईटपणाही ते या ठिकाणी चित्रित करताना दिसतात.

कवी म्हणतो उन्हे आधी समजावी लागतात तेंव्हाच सावली समजते. त्याचप्रमाणे दु:खे आधी झेलावी लागतात मगच सुखाची जाणीव होते. उन्हेवर झेलता आली तरच खाली सावली देता येते. त्याचप्रमाणे दु:ख स्वत:ला पचवता आले तरच दुस-याला सुख देता येते. जर कोणी त्याग करून आपणाला सुख दिलेच तर स्वत:ही थोडे दु:ख सहन करावे. हे सांगताना कवी म्हणतो देणा-याने दिलीच सावली तर थोडे उन्हांत यावे. पुढे कवी म्हणतो-

उन्हासाठी कोवळेपणीच / सावली सोडतात झाडे![८९]

येथे कवी झाड हे आदर्शवादाचे प्रतिक मानतो.

पिकल्या पानांना सनातनपणाचे दु:ख कधीच नसते. माती पाण्याला समजून घेण्यातच त्या पानांचे आयुष्य सरते. या पिकल्या पानाचे वय उन्हातच पिकून जाते. जे पानांच्या बाबतीत घडते तेच फांद्यांच्या बाबतीत घडते, तेच झाडाच्या बाबतीत घडते. झालेच बदल तर फुलात होतात. ते बदल-
बीजापर्यंत जाणारे-

झाडांची जात बदलणारे। [९०]

येथेही कवी फूल हे समाजातील संवेदनशील घटकाचे प्रतिक मानतो. समाजामध्ये कोणताही क्रांतीचा विचार हा समाजातील संवेदनशील घटक असणा-या विचारवंतांच्या मनात येतो. झाडांच्या बाबतीत फूल बदलते. त्याप्रमाणे विचारवंत वृत्तीतून हा विचार समाजापर्यंत पोहचवतात. फूलातून झाड बदलते. त्याप्रमाणे विचारवंतांच्या त्या वृत्तीतून समाज बदलतो व क्रांती घडते.

झाडात झाडाच्या हिरवेपणाखेरीज वाहणारी एक संततधार काष्ठधारा असते. फूल फांद्यांच्या विस्तारातून सतत बदलणारा गंधवारा असतो. झाडे मातीपण जाणवून घेतात. त्याचवेळी झाडाला वाळवीचा प्रादुर्भाव होतो ही वाळवी खोडाकडून फांद्यांकडे झेपावते. साहजिकच-

हिरव्यातून काष्ठधारेचे / पानापानात वारुळ होणे [९१]

येथेही कवी रुपकाच्या भाषेत बोलतो. झाड हा मानवी देह आहे. या देहाच्या हिरवेपणा खेरीज म्हणजे तारुण्याखेरीज एक संन्यस्तवृत्तीही असते. या देहात गंधवारा म्हणजे शृंगारही येत जातो. पण तरीही मानव शाश्वत काय आहे हे जाणतो. तरीही त्याला काम क्रोध मद मत्सराची वाळवी लागते. पण तरीही त्याच्यावर तो मात करतो व वारुळ होतो. वारूळ ही पूर्णत्याची प्रतिमा आहे. मानवाला असे पूर्णत्व येतेच.

असाच आदर्शवाद कवी प्रकट करताना दिसतो. पानामागून पान वाचले की झाडाची कथा समजून येईल. झाड हिरवेकंच दिसले तरी त्यामागील फांद्या मुळांवरील निर्घृण वार दिसत नाहीत. त्याचप्रमाणे मानवाच्या जीवनात एखादा आदर्श भव्य वाटतो पण त्यामागे भोगलेल्या यातना दिसून येत नाहीत.

असाच एखादा मानव आत्ममग्न असतो. त्याचाही विचार कवी झाडाच्या प्रतिकातून करताना दिसतो. झाडांना आपलीच मुळे आपलीशी वाटतात. त्याच्या हव्यासाचे तळे दूर असते. त्यांची

काष्ठधारा, पारंब्याची सुळे फक्त समजून घेतात. आपलेच सौंदर्य पाहण्यासाठी त्याच्या फांदीफांदीत डोळे असतात. ते झाड इतके आत्ममग्न असते-

भले माथीचे आभाळ असो / काळे अथवा निळे [९२]

येथेही झाड ही प्रतिमा मानवाच्या बाबतीत वापरली आहे. समाजात अशी माणसे असतात ती आत्ममग्न असतात. त्यांना स्वत:चे सर्व चांगले वाटत असते. ते फक्त स्वत:ला समजून घेतात. आपलेच सौंदर्य स्वत: पाहण्यात ते मग्न असतात. बाहेर समाजाची स्थिती कशीही असो त्यांच्या आत्ममग्न वृत्तीत फरक पडत नसतो.

पानाच्या बंडाने झाडे अस्वस्थ होत नाहीत. त्यांना उन्हाळे परिचित असतात. पण फुले रंग बदलू लागली की मात्र झाडे अस्वस्थ होतात. व

मुळांना समजावताना / झाडे संस्कारक्षम होतात [९३]

येथेही कवी झाड हे प्रस्थापितांचे, पाने हे सर्व सामान्यांचे, फूल हे बुद्धीवंतांचे प्रतिक मानतो. सर्वसामान्यांच्या बंडाने प्रस्थापित अस्वस्थ होत नाहीत. पण ज्यावेळी बुद्धीवंत बंड करू लागले की प्रस्थापित हादरून जातात. शेवटी स्वत:ला समजावतात की समाज हा बदलणाराच असतो.

असेच झाडही मानवाच्या बाबतीत प्रतिक वापरून कवी त्याचे अंत्यवर्णन करतो. बहराचा हंगाम उतरू लागतो तेंव्हा गर्द हिरव्या झाडातून हळूहळू भगवेपण (पिकलेपण) पाझरू लागते. तेंव्हा झाडे आपल्या फांदीफांदीतून विस्तार थांबवितात. फुलाचा हव्यास थांबवितात. हळूहळू झाडे विस्तारीत होण्याऐवजी मुळावर रेलू लागतात. झाडाची वाढण्याची पीतकळा पानापानावर पसरते. सोसाट्याचा वारा यावा व आपण उन्मळून पडावे असे वाटू लागते.

सावली निवा-याच्या पुण्याईची / हळवी होते तान..... [९४]

येथे ही झाडही वृद्ध माणसासाठी प्रतिक मानले आहे. माणसाचे तारुण्य संपले की वृद्धत्वाच्या छटा अंगावर उमटू लागतात. त्यावेळी माणूस कोणतेही विस्ताराचे कार्य करीत नाही. तारुण्याचा हव्यास, सौंदर्याचा हव्यास मानव त्यावेळी थांबवितो. वृद्धत्वाच्या छटा सर्व अवयवांवर पसरतात. आपल्याला मरण

यावे असे सारखे त्या व्यक्तीला वाटू लागते. अनेकांवर उपकार करून पुण्याई मिळविलेली असते. त्याची तहान हळवी होते.

कवीला वाटते अरण्यातील तत्वज्ञान नाकारले तरी अरण्य नाकारू नये. जरी आपण माथीचे आभाळ नाकारले तरी ढगाचे पुण्य नाकारू नये. कारण या ढगांमुळेच पाऊस पडतो. जरी झाडाखालचा देव मान्य नसेल तरीही त्या देवाला सावली देणा-या -

नवती धुमा-यांचे / मान्य करावे झाडपण [९५]

येथेही कवी अरण्यक हे समाजातील परंपरा रुढीचे प्रतिक मानतो तर अरण्य हे समाजाचे प्रतिक मानतो. जरी समाजातील वाईट रुढी प्रथा अमान्य केल्या तरी समाज नाकारू नये. समाजाचे सनातनीपण मान्य नसले तरी समाजातील लोकांचे दातृत्व मान्य करावे. देव मान्य नसला तरी, देवापाठीमागची मानवाची श्रद्धा मान्य करावी असे कवीला वाटते.

कवी विद्यापीठातून बाहेर पडणा-या संकरित वाणांवर व त्यांच्या पिढ्यांवर रोगनाशके आणि संजीवके फवारावी लागतात असे सांगतो. पश्चिमी वा-यातील सूक्ष्म जीवाणूंनीही झाडे बळी पडत आहेत. त्यातली अमली आर्द्रता त्यांना नादावतेय. या सुधारीत लागवडींना अकाली बहर येतो. झाड पुरे पोसण्या आधीच फुलले जाते. त्यामुळे पाणी घालणा-या हातानीच खुडावी लागली फुले तरी चालतील पण त्यातून पुढील वाईट गोष्टी टळतील एवढे करावेच लागेल कारण-

पुढील घनगर्द दीर्घजीवी / बागपणासाठी / एवढे पचवावेच लागेल जहर [९६]

येथेही कवी विद्यापीठातून बाहेर पडणारे वाण म्हणजे विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारी तरुण पिढी मानतो. ही तरुण शिक्षित पिढी व्यसनी व असंस्कृत निर्माण होत आहे. त्यामुळे त्यांना निर्व्यसनी व सुसंस्कृत बनवले पाहिजे. पाश्चात्य देशातून येणा-या वाईट प्रथा व व्यसनांच्या सूक्ष्म जीवाणूंना ती लगेच बळी पडते. त्यांना अमली (नशा) आर्द्रता नादावते. या तरुण पिढीला पोक्तपणा येण्याअगोदरच ते तरुण झाल्यासारखे वागतात व व्यसनाला बळी पडतात. पण ज्यांनी त्यांचा सांभाळ केला त्या पालकांनी कठोरपणे त्यांना मार्गावर आणले पाहिजे. पुढील सुसंस्कृत समाजासाठी एवढे कटूत्व स्वीकारलेच पाहिजे असे कवीला वाटते.

असेच कवी काश्मीरच्या स्थितीचे ध्वन्यर्थाने एका कवितेत वर्णन करताना दिसतो. कवी म्हणतो जंगलपण उठणे या प्रदेशाला माहिती नाही. जातीवंतांची वारेमाप झाडमोड व विदेशी झडो-यांची घुसखोरी मोठ्या प्रमाणात झाली तरी सुद्धा कित्येक जात्यंध बीजांची आक्रमणे या जंगलाने परतवली. अरण्यवैरी कु-हाड व हातही धुळीस मिळवले आहेत. चगळाने येणारे प्रत्येक संक्रमण स्वीकारत स्वत:चे झाडपण सांभाळत सावली निवा-याच्या परंपरासह टिकवून आहेत जंगलपण. मलय चंदन अथवा काश्मीर गुलाब टिकवून आहेत. हातोडे छन्नीतून वाचलेली गर्द शिखरे टिकवून आहेत. येथील झाडांचा वाण किंवा पोत बदलता आला नाही-

खैबरखिंडीला किंवा समुद्री गलबताला / जंगलपणा उठणे माहीत नाही या प्रदेशाला [१७]

येथेही जंगल हे प्रतिक काश्मीरसाठी कवीने वापरले आहे. येथील माणसांची वस्ती उठणे हे या प्रदेशाला ठाऊक नाही. विदेशी घुसखो-यांना वारेमाप प्रमाणात जातिवंत काश्मिरी लोकांच्या हत्या केल्या. तरीही ही परकीय आक्रमणे या लोकांनी परतवून लावली. येथील सामान्य लोकांनी हे समाजवैर धुळीस मिळविले. येणारे प्रत्येक आक्रमण स्वीकारत आपल्या परंपरा संस्कृतीसह प्रदेश राखला. या आक्रमणातून वाचलेला प्रदेश टिकवून ठेवला. येथील परंपरा, संस्कृती मुस्लीम व इंग्रजी आक्रमणकर्त्यांना बदलता आली नाही.

शहरासाठी बाग हे प्रतिक वापरून कवी शहरातील जातीय दंगली बाबत विचार व्यक्त करताना दिसतो.

दिवस वटारलेल्या डोळ्यांनी झुकला. सूर्याने आपली शांततेची किरणे बागांवर टाकली. त्याचबरोबर काळा गडद चांदणरहित दहशती अंधार बागेला लपेटला. या अंधारामुळे झाडे उरातल्या थंडीने थडथडू लागली. पाने निपचित पडली. रातकिड्यांचा सायरन बागभर किर्रारला. फुलझाडे भीतीपोटी धडाडली. वेलीने गर्भ गाळला. बागपणाच्या हव्यासापायी हे असे घडते. रात्रीच्या बळजबरीतून-

वाचलेली फुले / उजाडताच कुणीतरी खुडते [१८]

बागा हे शहराचे प्रतिक, झाडे-वेली-फुले हे स्त्रीचे प्रतिक, दहशती अंधार हे दहशतीचे प्रतिक मानून शहरातील दहशती वातावरणाचे चित्रण कवीने केले आहे. कवी म्हणतो शहरामध्ये रात्र झाल्यानंतर कोणत्याही सुरक्षिततेशिवाय(चांदणरहित)दहशतीचे वातावरण पसरते. येथील स्त्रिया या दहशतीने धडधडू

लागल्या. पोलीसांच्या गाड्यांचे सायरन वाजू लागले. या भितीने काही स्त्रियांनी स्वत:हून जाळून घेतले. शहरीपणाच्या हव्यासामुळे हे सर्व घडते. रात्रीच्या बळजबरीतून वाचलेल्या स्त्रिया सकाळी कुणाच्या तरी बळजबरीला बळी पडतात.

देशामध्ये दलाल, भ्रष्टाचार करून जगणा-यांची एक जात आहे. त्यावर उपरोधात्मक टीका ते करताना दिसतात. अशा लोकांसाठी ते झाड हे प्रतिक वापरतात. अशा झाडांची एक जात असते. जी नुसत्या खत पाण्यावर म्हणजे भ्रष्टाचारावर जगते. ज्यांचे आयुष्य चहाड्या करण्यातच संपते. एखाद्या साध्या वावटळानेही जे अस्थिर होतात, फक्त ते माणसासारखे दिसतात म्हणून त्यांना माणूस म्हणायचे. जे विश्वासू नसतात, दलदलीत ज्यांचे आयुष्य सरते, ज्यांना मातीचे मातृत्व प्राप्त नसते, कुजलेल्या महानगरीत तयार झालेल्या उकिरड्यांमुळे नुसत्या खतपाण्यावर-

वाढणा-या झाडांचीही / एक जात असते [९९]

काळाच्या ओघात सर्वच वस्तू तकलादू होतायत. सगळेच संदर्भ बदलत आहेत. माणसामाणसातली एकात्मता नाहीशी झाली व त्यामुळे त्यांची शक्ती क्षीण झाली आहे. त्यामुळे सहाजिकच नको त्या घटकांना महत्व प्राप्त झाले आहे. झाडामध्येही पूर्वी कमी महत्व असणा-या पारंब्यांना आता महत्व आले आहे. मूळ आधार असणारे खोड तकलादू झाले आहे. फांद्याही एकमेकांशी नाते सांगत नाहीत. सहाजिकच त्यांच्यात एकात्मता नसल्याने वादळवा-यात त्यांची हानी होते. हे पारंब्यांचे टेकू कोणापुढे कधी लपतील हे सांगता येत नाही. म्हणूनच कवी म्हणतो-

पारंब्यांचे राज्य / उतरलेय जंगलांवर [१००]

राष्ट्रीय एकात्मकतेचे प्रतिबिंब या कवितेत पडले आहे.

आणखी एका कवितेत देशातील सद्य:स्थिती, जंगल व झाड या प्रतिकातून व्यक्त करताना कवी दिसतो. कवी म्हणतो पूर्वी देशात अशी जागृती होती की या देशात आलेली सर्व बांडगुळे येथील लोकांनी हद्दपार केली होती. जंगल स्वतंत्र केले होते. नंतर मात्र वादळवा-याने, आपसातल्या करकरीने वणवे पेटले. काही बुजूर्ग वृक्ष त्या मध्ये उन्मळून पडले तर काही जळून गेले. दंगली वा-यातून काही बचावले. पश्चिम देशातील वा-याने काहीजण स्वामित्वाच्या हव्यासाने येथील कोंभारे पेटले. येथील प्रत्येक जण स्वतंत्र होऊ पाहतोय. स्वजातीचे राज्य स्थापन करू पाहतोय. नवत्या कोंभा-या (युवकांना) नाही भोवतालच्या

फसव्या मोहराची (खोट्या आश्वासनाची) नशा चढली आहे. या सर्वांमुळे येथील भूमी अस्वस्थ, अगतिक आहे. तरीही मुळांच्या (तळागळातील लोकांच्या) चळवळीच्या हालचालीने झाडे गतिमान होऊ पाहताहेत. त्यांना योग्य अशा नेतृत्वाची गरज आहे म्हणून कवी म्हणतो-

झाडे जंगलाबाहेरही वणवणताहेत / शोधार्थ माळ्याच्या[१०१]

याही कवितेत झाड व जंगल या प्रतिकांच्या माध्यमातून कवी सद्य:स्थितीवर बोट ठेवतो. कवीला वाटते झाडे लावण्यात आणि उगवण्यात बरेच अंतर आहे. एखाद्या देवस्थानच्या आश्रयाने किंवा संरक्षित क्षेत्राच्या फतव्याने झाडे सुरक्षित असतात. त्याप्रमाणे माणसेही (वाईट प्रवृत्तींची) संरक्षित असतात, त्यांच्यातील विषारीपणासहित. या विषारीपणामुळे त्यांना तोडावे तर दंगल उठते. पुढा-यांचेही डोळे तांबरतात. हे लोक पद्धतशीरपणे देवळाचा पार गाठून, क चे-यांच्या हद्दी गाठून आपली पिलावळ निर्माण करतात. त्यावेळी आजूबाजूची जनता (वनराई) खळखळ करत नाही. या पिलावळी देशभर पसरत आहेत. ही पिलावळ (पुढारी) दुरून साजरी दिसते. लोकांना मान्य आहे असे वाटते. पण तरीही त्यांना लोकनेतृत्वाची सर येत नाही. म्हणून कवी म्हणतो-

लावण्यात आणि उगवण्यातही / बरेच अंतर असते[१०२]

हा देश एकसंघ रहावा म्हणून प्रयत्न झाले. चांगल्या क्रांत्या झाल्या. या देशाच्या मातीत हा मोठेपणा होता. आता मात्र या देशामध्ये फूट पडू पाहतेय. या देशाच्या मातीचा कस कमी झाला की काय असे वाटते. येथील झाडांचे (सामान्य लोकांचे) म्हणणे या जंगलात (देशात) क्रांती व्हायला हवी. संपूर्ण झाडवळ (वाईट प्रवृत्ती) तोडून, येथील माती तपासून घ्यायला हवी. आता पर्यंत या मातीचा पोत चांगला होता. तो एवढ्यातच बिघडला असावा. सरसकट झाडे पश्चिमी (देश) वाणावर जाऊन विखारी फळे प्रसवताहेत. मुळे, खोड, फांद्यांचा विस्तार तोडून स्वायत्तता मागताहेत. या झाडांना झाडपणाची (माणुसकी, देशभक्तीची) जाणीव देणारी संजीवके दिली पाहिजेत व

या जंगलातील माती..... / एकदा तपासून घ्यायला हवी / असे झाडांचेच म्हणणे[१०३]

वृक्षवेद या काव्यसंग्रहातील मलपृष्ठाच्या कवितेतही मानवी जीवनाचे प्रतिबिंब उमटले आहे. झाडांची काही वैशिष्ट्ये असतात. ज्यामध्ये त्यांचे दातृत्व, त्यांची सहनशीलता, त्यांची क्षमाशीलता

यालाच कवी झाडपण असे म्हणतो. झाडाला पावसाचे थेंब जसे झटकता येतात त्याप्रमाणे हे झाडपण झटकता येत नाही. ही थेंबगाणी ते काष्ठ संहितेत गोंदून ठेवतात. त्यांना झाडपण कुराणात, बायबलात किंवा गीतेत शोधावे लागत नाही. झाड माथ्यावरचा पाऊस घेऊन, सावली करीत फळांचा ऊरुस वाढवत राहते अंकुरधारा म्हणूनच कवी म्हणतो-

मातीत उपटत नसतो एकाकी / अवघा झाड पसारा [१०४]

झाडांचे रुपक वापरून कवी मानवी जीवनावर प्रकाशझोत टाकताना दिसतो. त्यामध्ये जातीय दंगल, राष्ट्रीय एकात्मता, भ्रष्टाचार परकीय आक्रमण या विषयावर प्रकाश टाकताना कवी दिसतो.

पाणीप्रश्न

कवीची पाणी प्रश्नावर एक कविता आहे. या कवितेत ही झाडे पाण्याच्या शोधात फिरत आहेत असे कल्पिलेले आहे. झाडे पाण्यासाठी बंड करीत आहेत. त्यांना आहे त्या परिस्थितीत जगायला लावणा-या सर्व घटकांवर ते हल्ला चढवीत आहेत. पाण्यासाठी क्रांती करत असताना ही झाडे धोंगावत आक्रमण करत आहेत. पायतळीचा वैराण दुष्काळ, झाडांना करपवणारा शुष्कमाळ, यांना भेटून, खडकाला फोडून, थेंबाच्या शोधात ही झाडे जंग करीत आहेत. माणसाने नदीमध्ये मतलबीपणाने अडथळे (धरणे) निर्माण केले. या झाडांची मुळे हे कॉंक्रीट कधी फोडतील हे सांगता येत नाही. एक प्रकारचा एल्गारच पाण्यासाठी ही झाडे करीत आहेत. या झाडांनी ठरविले आहे पाणी लुटणा-यांचे गळे आवळण्याचे नटव्या बागांचे नखरे उखडून काढण्याचे. कॉंक्रीट जंगलाच्या दिशेने जाणारे पाण्याचे मार्ग झाडांनी शोधून काढले आहेत. आता पर्यंत शहरांचे झाडांवर आक्रमण होत होते. आता झाडेच शहरावर आक्रमण करीत आहेत. म्हणून कवी म्हणतो - दरवाजा शहराचा नीट बंद केला आहे का? शत्रूची प्रत्येक रसद, शिबंदी झाडे तोडून टाकतील. झाडे लेकरासाठीही पान्हावणार नाहीत. नाजुक ओठांसाठी फळे देणार नाहीत. तमाम ओठांच्या भुकेचा प्रश्न झाडे खिंडीत धरणार आहेत. कदाचित परदेशातून आयात होणा-या मालाचा आधार लोकांना वाटेल. डोळे, कवाड मिटून झाडांचा हा आक्रोश मिटणार नाही. हा आक्रोश मिटू नये असे वाटणा-यांनी या जल्लोषाचे स्वागत करावे. झाडांच्या या दुष्काळ दिंडीत त्यांनी थोडे चालावे कारण ते तुमचे भाईबंद आहेत. म्हणून कवी म्हणतो

हा आवाज ऐकलात का / धोंगावत येणा-या झाडांचा [१०५]

मराठी साहित्यातील पाणी प्रश्नावरील एक महत्वाची कविता म्हणून वरील कवितेचा उल्लेख केला जातो.

प्रेमकविता

नारायण सुमंत यांच्या प्रेमकविताही निसर्गाच्या माध्यमातूनच साकारतात. काही प्रेमकविता निसर्गावर आधारीत आहेत. तर, मानवी प्रेमही निसर्गप्रतिमातून ते साकारतात.

एका कवितेत कवी म्हणतो रान आपली हिर्वळ फेडून चिंब उन्हात न्हाते. त्यावेळी दिवस नभात लाजतो. दिवस मेघांची छाया आडवी नेसून रानाच्या मनात चोरून येतो. त्यावेळी माती हळद लेते. रानाच व दिसाच हे वागणं बर न्हवं अशी रानातील पाना पानात कुजबुज उठते. पण गावभर झालेला हा बोभाटा कुनी सांगायला मात्र धजेना. ज्यावेळी ढग वा-याने ओढले जातात त्यावेळी उन्ह पिकात मावत नाहीत. दिसाची व रानाची थेट भेट होते. त्यांच्या प्रेमाच्या धुंदीत-

आड रानाच्या भेटीत / दिस बुडता कळना [१०६]

रानामधल्या रात्रीला चांदणं उतरु लागलं. त्यावेळी रातकिड्याच्या सुराचं घुंगरु वाजू लागले. यावेळी रान मुकाट होऊन सगळीकडे डोळ लावून थांबले. त्याचवेळी वाटेवरील काळोख चांदण्याची चाहूल घेत होता. वा-यात नाद भिनला व त्या नादाने रान बेभान झाले. दूर झाडाची पाने पैंजणासारखी वाजू लागली. उफाड्यातलं चांदणं वाट उतरु लागलं आणि

रातकिड्यांच्या सुराचं / मुक झालेलं घुंगरु [१०७]

कवी झाडाला म्हणतो तुझे पाय पांदीच्या पाण्यात भिजवू नकोस. तुझं तेजाळ रुपडं ओढ्याला दावून त्याला भुलवू नकोस. तुझं उफाड्यातलं पाऊल रानात वाजवू नकोस. तू राघूलाही भुलवून त्याची शिळ ऐकण्यासाठी डोळं उडवू नकोस. पान्यावर पाखरं भर उन्हात येतात तेंव्हा-

त्येच्या वढळा डोळ्यांना / उगं फितवू नगस [१०८]

मस्त काळोख झोकून झाडं बांधाशी थांबली. वाट भटक्या पायांनी त्या झाडाच्या संगतीला येऊन थांबली. रात्रीची चाहूल पाखरांनी सांगितली. रात्र एकटी रानात निळ्या नभाला भेटली. टाकळीच्या फुलाने आपल्या गंधाने वाट भारून टाकली त्यावेळी-

गर्द जांभळ्या रातीला / झाडं वाटेला झोंबली[१०९]

माध्यावरली कोवळी उन्हं बाभळीवर रेलून पिकली. त्यामुळे ऐन फुलांतली हळवी बाभूळ पानापानात हळदून गेली. हा हंगाम असाच रहावा असं ती लाजून म्हणाली. नवीन पानावर फुलांनी हलकेच गाणी म्हटली. तेंव्हा तिच्या उभार बांध्याच्या नाजूक वळणावर वा-याने हलकेच फांद्याची किनार ओढली. रान या बाभळीला पाहून केंव्हाच वेडंपीस झाल होतं. पाखरही घरटी विसरून रेंगाळली आणि-

मावळतीची भगवी उन्हं सुद्धा / तिच्यावर फिदा झाली![११०]

कवी नारायण सुमंत निसर्गावर प्रेमकविता करतात त्याचप्रमाणे त्यांच्या कवितेत मानवी प्रेमही येते. प्रेयसीचे आगमन किती अल्हाददायक असते याचे वर्णन निसर्ग प्रतिमानी कवी करतो. ओढ्याला पाणी भुलवत मनाला गाणी भिजवतात. त्याचप्रमाणे प्रेयसीच्या पावलानी वाट तरणी होते. प्रेयसीच्या रुपाने रानी नव्हाळ फुलते. त्या नव्हाळीला पाहून डोळे व्याकूळ होतात. प्रेयसीच्या पावलानी उरातून शिळ येते. मन पाखरू होतं. प्रेयसीच्या येण्याने दिवसा स्वप्न पडतं. धान्य फुलोरा धरतं पोटरीत कणीस हासत

आणि / कानी वारं ग शिरतं तुझ्या पावलानं[१११]

पाऊस गर्द झाला. दाणं मातीत रुजलं. मातीला पदर आला व रान गर्भार झालं. तशी काहीशी अवस्था प्रेयसीची झाली. प्रियकराची आभाळासारखी माया त्या प्रेयसीने झेलली. त्यामुळे ती प्रेयसी यठल्या बाभळीसारखी होती ती त्या मायेने फुलात आली. पण तिचा फुलोरा प्रियकराला दिसेना. प्रियकराच्या विरहाने प्रेयसीची कुडी जळते. पण तिला कुठं प्रेमाचा पाऊस भेटेना म्हणून ही प्रेयसी प्रियकराला म्हणते-

तू मोप पोरनारा / पर हंगाम कळंना[११२]

प्रेयसीच्या पावलाची साद येताच रान झिंगून गेले. उरात कातरवेळ उभी राहिली. प्रेयसी-प्रियकराचे डोळे कोण बघतंय का म्हणून वाटेकडे लागले. तिचे बोल प्रियकराला उंबराच्या फुलासारखे वाटले. प्रेयसीला पाहून पीकही बेभान झालं. तिचे सौंदर्य पाहून आभाळाचं भानही गेलं आणि त्याने

हळदी दिठीवर तुझ्या / त्येनं चांदणं पेरलं![११३]

कवी नारायण सुमंत यांच्या प्रेम कवितांचे स्वरुप असे आहे. निसर्ग प्रेम त्यांची कविता चितारतेच. पण त्याबरोबर मानवी प्रेमही निसर्ग प्रतिमांच्या माध्यमातून त्यांची कविता चितारते.

शेतक-यं ा वरील अन्याय

कवी नारायण सुमंत यांच्या निसर्ग कविता ज्याप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे शेतकरी जीवन व दुष्काळ यांचे चित्रण करणा-याही कविता मोठ्या प्रमाणात आहेत. शेतक-यांवर होणा-या अन्यायाचा, त्यांच्या दु:खाचा पाढा ते या कवितेत वाचतात.

कवी म्हणतो गरीब कष्टकरी शेतक-याचा कुठेच इतिहास नाही. अगदी पराभूत म्हणूनही त्यांचा उल्लेख नाही. पूर्वी कधीतरी शेतक-यांनी लढा दिल्याचा उल्लेख बखरीत आढळतो. पण सैन्य म्हणून राजे जिंकले. गडावर विजयाच्या तोफा उडाल्या. शेतक-याची सावकारी गहाणखत मात्र सावकाराकडेच राहिली. आता राजे गेले. लोकशाही आली पण या सत्तांतरातही शेतक-यांच्या जमिनी सावकाराकडेच गहाण. आता शेतक-याने विचार करण्याची पद्धतच बदलली पाहिजे. म्हणून कवी म्हणतो-

स्वत:लाच नांगरून घ्यावे म्हणतो मी / पुन्हा एकदा[११४]

शतकानुशतके शेतक-यांची लुटमार चालूच आहे. त्यांच्यावरील अन्याय हा प्रत्येक राजवटीत तसाच राहिला. सुलतानशाहीत लुटणार होती. इंग्रज राजवटीत भाडखाऊ आणेवारी होती. स्वातंत्र्य आले तरी नोकरशहा शेतक-याला लांडग्यासारखे लुटत असतात. आता विज्ञानयुग आले, संगणक आला तरीही शेतक-यांची लूट थांबली नाही. हा दु:खडाग झाकण्यासाठी कपाळावर केशरी टिळा लेवून एकविसाव्या शतकात शेतकरी पुन्हा कष्ट करायला उभा आहे. कमरेवर हात ठेऊन तो पावसाची वाट पहात-

ईशान्येला आषाढी / तर नैऋत्येला कार्तिकवारी[११५]

खेडेगावातही शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे शेतकरी आता शिक्षित होत आहे. त्याला सरकारी योजना माहित होत आहेत. आश्वासनाचा सुकाळ त्याच्या भोवती आहे. सबसिडीच्या डंक्याने व अनुदानाच्या धुक्याने त्याची फसगत होत आहे. शेतकरी शहीद होत आहे. बनावट औषधाने, हरामखोरी आयात निर्यातीने, भ्रष्टाचाराने शेतकरी अस्वस्थ होत आहे. ही अस्वस्थता काकरीकाकरीतून प्रकट होत आहे. आता शेतकरी प्रत्येक इयत्तेगणिक अस्वस्थ होत आहे. त्याने ओळखले आहे-

अन्यायाचा जाब विचारण्याचा / हंगाम जवळ येतो आहे [११६]

शेतक-यांवर व सर्व भारतावर अन्याय करणारे सातासमुद्रापलीकडचे ठसे अजून पुसले नाहीत. आता स्वातंत्र्यातही या देशातला नोकरवर्ग रावसाहेब व भाऊसाहेब त्याच ठशांवरून येत-जात आहेत. त्याच कौलारू तहसिलात शेतक-याच्या अस्तित्वाच्या चतु:सीमा पिवळट गठ्ठामध्ये (सातबारा,खातेउतारा) बंद आहेत. शेतक-याचे पूर्वज अनवाणी पायाने या तहसिलात कामासाठी खेटे घालत होते. त्यांच्या डाव्या हाताच्या निशाण्या अजूनही पिवळट गठ्ठात बंद आहेत. आता परिस्थिती तीच आहे. फरक फक्त इतकाच पडला आहे-

दस्तूर मात्र / सुवर्ण महोत्सवी स्वातंत्र्याचा [११७]

शेतक-यांवरील अन्याय किती प्राचीन आहे हे सांगण्याचा प्रयत्न कवी करतो. भारतीय संस्कृतीचा इतिहास प्राचीन आहे. पण तितकाच प्रचीन शेतक-यांवरील अन्याय आहे. शेतकरी या अन्यायाचा प्रतिकार करण्यात दुबळा पडतो. म्हणून तो अन्याय करणा-या व्यक्तीची नावे बैलांना देतो. व त्याच्यावर त्या नावाने कोरडे ओढतो व मनाचे समाधान करून घेतो. प्रत्येक युगानुसार ही नावे बैलांना ठेवली आहेत. सत्ययुगात-सोमदत्त्या, वृषभशिंग्या, हलविणा-या नंद्या, कृतयुगात- वशिंड्या, बळीध-या, न-या, हिरण्या, त्रेतायुगात- रावण्या, वामन्या, परषा, राम्या, द्वापारीयुगात - गिरध-या, धर्म्या, भिम्या कलीयुगी- राजा, सर्जा, सरदा-या, परधान्या लोकयुगात- साहेब्या, वकील्या, फौजदा-या, मंत्र्या हैक अशी सहस्त्रनावे बैलांना देऊन तो हाकतो त्यांच्यावर आसूड ओढतो व त्यांना राबवून घेतो. पण तरीही या शेतक-याची स्थिती-

माझ्या हाती चिकटलेय रुमणे / पिढ्यान पिढ्या, युगान युगे; हां ऐक [११८]

शेतक-याच्या बाबतीत असे झाले आहे , ज्यांनी शेतक-याचे रक्षण केले पाहिजे तेच शेतक-याचे भक्षक झाले आहेत. शेतकरी मात्र या गोष्टीपासून पूर्ण अज्ञानी आहे. या कवितेत या भक्षकांसाठी कुत्रा हे प्रतिक मानून कवी म्हणतो वस्तीवरील कुत्र्यांवर भिस्त ठेऊन शेतकरी डाराडूर झोपलेला. ज्यांच्यावर त्याने भरवसा ठेवला ती कुत्री मात्र शेलकी कणसे धुंडाळत शेतातून फिरत आहेत. शेतक-याने दिलेल्या भाकरीवर त्या पाळीव कुत्र्यांचे पोट भरत नाही. सकाळ होताच पिकांची नासाडी पाहून शेतकरी गावातील सून्या कुत्र्यांना शिव्या देईल आणि त्याचवेळी घरचा पाळीव कुत्री मात्र-

भाकरीच्या प्रतीक्षेत / चाकरी बहल[११९]

शेतक-यावरील पिढ्यान पिढ्या होणारा अन्याय कवी येथे चित्रित करतो. शेतक-यांवर होणारा हा अन्याय किती प्राचीन आहे व त्याचा विस्तार किती आहे हेच या कवितांमधून दिसून येते.

शेतक-यांचे दु:ख

आपला देश कृषिप्रधान देश आहे परंतु, आपल्या देशात शेतकरी अधिक दु:खी आहे. शेतक--याचे दु:ख, दारिद्रय हे कधीही न संपणारे आहे. त्याचाच विचार कवी येथे करताना दिसतो.

शेतकरी बाजारत शेतमाल आणतो त्यावेळी जगाला ते फक्त उत्पादनच दिसते. त्यामागील शेतक--याचे अपार कष्ट दिसत नाहीत. म्हणूनच कवी शेतक-यांना सांगतो तुझी फक्त रास जगाला दिसली. तुझ्या वेणा काळजातच राहिल्या. तुझ्या मालाबरोबर तू तुझी वेदनाही बाजारात मांड आणि-

पिळणा-या हर एक / चरकाशी भांड![१२०]

येथे चरक हे दलाल, भ्रष्टाचार यांचे प्रतिक आहे.

शेतक-याचा जन्म सातबाराच्या नोंदीतूनच होतो. त्या नोंदीवरच शेतक-याची स्वप्ने बांधली जातात. त्याचे हे स्वप्न बांधातून, उरळ्यातून ठिबक सिंचनामधून प्रत्येक हंगामात उभे राहतं. त्या स्वप्नावर शेतकरी उगवतो आणि बाजार भावानुसार मावळतोही. मग कष्ट करीतच केंव्हातरी या शेतक--याच्या जीवनाचे रुमणे मोडून पडते आणि-

तो संपतो / कंसानेच / सात बाराच्या![१२१]

शेतक-याच्या मागील दारिद्रय संपत नाही त्याचे कर्ज फिटत नाही. त्या कर्जातच तो संपून जातो. कुळवाचा तास घालून आडतास उरकल्यानंतर शेतकरी तंबाखुसाठी चंची पालथी करतो तर ती रिकामीच. तो स्वत: शेतात कष्ट करतो तरीही त्याचे भागत नाही मग बायको, पोरगा, पोरगी यांनाही शेतीच्या कामात घालतो. त्याने कर्ज घेतल्यानंतर उठवलेला अंगठा सतत तसाच ओला राहतो. शेवटी तो कुळवाचे येटण सोडवतो व बामूळ गाठतो, आपले जीवन संपवण्यासाठी शेतक-याने कर्जासाठी आत्महत्या केली म्हणून विधानसभेत मनोरंजक चर्चा होते. प्रश्न विचारला जातो त्यावेळी उत्तर येते-

कृषिप्रधान राष्ट्रात / शेतक-यांनी आत्महत्या करायची नाही / तर मग कुणी? [१२२]

शेतकरी अनेक समस्यांनी वेढला गेला आहे. त्यातच ज्यावर शेतकरी अवलंबून आहे तो शेतमालही अनेक कारणांनी कमी होत आहे. मग अशा परिस्थितीत कवी शेतक-याला म्हणतो तू स्वत:चे दु:ख लिहून बाजारात मांड व ते विकायला शिक. मोकळे आभाळ, त्यानंतरचा दुष्काळ, पोरांची होणारी अबाळ, खंगलेले बैल हे सर्व लिही. पण तरीही कवीला वाटते या दु:खाला कोणी बाजारात घेणार नाही. कारण याला काही छंद नाही व वृत्तही नाही. दु:खही कसे हवे तर नुकत्याच आंबट ओल्या मातीतून उगवलेल्या हिरव्याकंच कोंभासारखे किंवा ज्वानीने रसरसलेल्या स्त्रीच्या विरहासारखे, नाहीतर गच्च घाटाला लगडलेल्या चांदण्यासारखे दु:ख हवे. शेत पिकवणे सोड व असे लिखणे दु:ख पिकवायला शिक असा सल्ला शेतक-याला देऊन कवी त्याला म्हणतो-

पिकत नाही माल / तर दु:ख पिकवायला शीक [१२३]

आणि खरेच शेतकरी शेतीचे उत्पादन मिळत नाही म्हणून उत्पन्नाचे वेगवेगळे मार्ग शोधू लागला आहे. खरे तर पिकामध्ये तण वाढू नये म्हणून शेतकरी काळजी घेत असतो. पण या कवितेतील कवी मात्र तण शेतामध्ये वाढवण्याचा सल्ला देतो. कारण तणाच्या सान्निध्यातच पिके बळावतात. पिकावर फक्त शेतसारा भागतो तर तणाच्या दोन नंबरी उत्पन्नावर प्रपंच नेटका होतो. सध्या रान न नांगरताच मळा कवी पिकवतो म्हणून-

त्याने सा-या गावालाच / आता माझा तळा! [१२४]

शेतक-यांची नवीन पिढी साक्षर होऊ लागली आहे. शेतक-यांच्या पोरांच्या हातात पेन्शिली आल्या. त्यामुळे त्यांचे तळहात झिजू लागले. त्यामुळे या हातानी काम होईना. साक्षरतेबरोबरच नवीन ज्ञान आले. स्वयंचलित गाड्या आल्या. बापासहित पोराच्या डोळ्यासमोरे स्वप्नांची झुंबरं लटकू लागली. त्यांचे राहणीमान सुधारले. पोरांच्या शिक्षणामुळे गाई रानोमाळ बेवारस व्याल्या. तरीही या शिक्षणामुळे फक्त ज्ञान मिळाले सुबत्ता शहरापुरतीच मर्यादित राहिली म्हणून कवी म्हणतो-

सकस आहारे पेंढा / नांदतो गोकुळात / कृष्ण दंगतो सुकडीत / तर कधी तांदुळात[१२५]

शेतक-याचे शेतीवर भागेना त्यामुळे घरातील कर्त्या मुलांनी नोकरीसाठी महानगरे जवळ केली. पण शहरात नोकरीसाठी जाण्यासाठीही या शेतक-यांच्याकडे पैसा नसतो. त्यासाठी दावणीचा बोकड विकण्याची पाळी या शेतक-यावर येते. शेतकरी, चांगला सांभाळलेला धष्टपुष्ट पोरगा आणि बोकड बाजाराकडे जातात. बोकड विकल्यानंतर पोरग्याला नोकरीच्या दावणीला बांधले जाईल म्हणून कवी म्हणतो-

बोकड विकला जाईल /बाजारांत / आणि मग पोरगा / .....मुंबईत, त्यानंतर![१२६]

दोन-तीन वर्षांपूर्वी नवे सहस्रक अगदी गाजावाजा करीत आले. पण या नवीन सहस्रकाचे सर्व सामान्य लोकांनी व शेतक-यांनीही स्वागत केले. त्यांना वाटले नवीन सहस्रकाबरोबर आपले दु:खही जाईल. केवळ सहस्रक संपले पण अजूनही परिस्थिती बरी आहे. एखादे तरी झाड प्रत्येकाच्या बांधावर फास लावून घेण्यापुरते शिल्लक आहे. हेच विहंगम दृश्य नवीन सहस्रकाला पहायला मिळेल. अजूनही शेतकरी, सर्वसामान्यांना काय खावे हा वारसा हक्काने मिळालेला प्रश्न सुटलेला नाही. पण आसनस्थ लोकांना मात्र 'आता कोणाला खावे?' हा प्रश्न कधीच पडला नाही. सहस्रकात नसबंदी गरीबांची होते. गरिबीची होत नाही. त्यामुळे या नव्या सहस्रकाला श्रीमंत लोकांत, त्यांच्या पार्ट्यात आपली पहिली नजर टाकण्यास सांगतो. पण हे सहस्रक या सर्वसामान्य लोकांच्याकडे वेंधळ्यासारखे पाहते. त्यावेळी कवी त्याला सांगतो या शेतक-याच्या डोक्यावर (बळीराजाच्या) वामनाचा जो पाय आहे तो अजूनही आहे. कवी या सहस्रकाला म्हणतो, तुझ्यात जर हिंमत असेल तर या मस्तकावरील पायावर आसूड ओढ. मग सर्व शेतकरी वर्गही म्हणेल-

वेलकम फर्स्ट मिलिनियम वेलकम / वेलकम![१२७]

सर्वसामान्य शेतक-यांच्या व्यथा, वेदना, दारिद्रय यांचा पाढा ही कविता वाचते. या व्यथा वेदना परिस्थितीने प्रस्थापितांनी त्यांच्या वाट्याला दिली आहे हेही येथे नमूद करतो. या व्यथा वेदना, दु:ख, दारिद्रयावर मात करण्यासाठी शेतकरी धडपडत आहे पण तो अधिकच खोल रुतत चालला आहे.

शेतजमीनीवरील आक्रमण व वाढते शहरीकरण

वाढत्या शहरीकरणाचा परिणाम म्हणजे पिकाऊ जमीन लोकवस्तीसाठी वापरली जात आहे. शहरांचे खेड्यावर आक्रमण होत आहे. त्यातच शेतीची स्थिती अशी दयनीय आहे की शेतक-यालाही एन.ए. पद्धत आवडलेली(नाइलाजाने) आहे. जमीनीचा एन.ए. होण्याचे तेवढे एकच स्वप्न आता शेतकरी पाहत आहे. म्हणून कवी म्हणतो हे स्वप्न पूर्ण होण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु आहेत. महानगरीची कक्षा रुंदावत आहे. त्यांना तुझ्यासह तुझ्या जमीनीची गरज वाटेल ते तुझ्यासह (बिगरशेती) तुझ्या जमीनीचा एन.ए. करतील. जर तुला हे कबूल नसेल तर बेशक शेवटून ठेव फाळ बांधावर

आणि हातात / हरित झेंडा! [१२८]

कवी नारायण सुमंत यांनी वाढत्या शहरीकरणाबरोबरच शेतीवर होणारे दिशाहीन संशोधन यावरही प्रकाश टाकला आहे. डोंगर ढग अडवतात व त्या त्या भागावर पाऊस पाडतात. पण तरीही शहरांची गरज भागविण्यासाठी हे डोंगर पोखरले जातात. साहजिकच ढगांना अडविणार कोण तर त्यासाठी टेंडर्स मागविली जात आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांनीही भांडवल गुंतवावे असे राष्ट्र प्रमुखांना वाटते. पाऊस कमी झाला त्यामुळे साहजिकच शेतीसाठी वेगळे उपाय योजावे लागतील. म्हणून

पाण्याविना शेतीच्या / संशोधनात / गुंतले आहेत संशोधक! [१२९]

वाढत्या शहरीकरणाचा शेतीवर होणारा परीणामही कवीने अशाच प्रकारे चित्रित केला आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

बाजारभाव

शेतक-याच्या समोर असणारी आणखी एक समस्या म्हणजे बाजारभाव. अस्थिर बाजारभावाचा फटका सर्वच शेतक-यांना बसतो. त्याचे चित्रणही नारायण सुमंत यांची कविता करते.

बाजारपेठ व पुरवठ्यावर बरेच संशोधन झाले आहे. जेणे करून किंमत कमी होत राहील व बाजारपेठेला मालही येत राहील. शेतक-याला कळत नाही की, पिकावरील किडीपेक्षा बेभरवशाची बाजारी कीडच कुणबिकीला कुरतडते आहे. आता या किडीवर शेतक-यानेच औषध शोधले पाहिजे. बाजारपेठेत किमान हमीचा भाव मिळाला पाहिजे. हे औषध शेतक-याने शोधले तर-

मात्र पेटंट करू नकोस / समजावून दे फॉर्म्युला / आ सेतु हिमाचल[१३०]

शेतक-याच्या मालाला भाव नसेल तर तो माल उकिरड्यावर फेकावा तसा दलालांच्या आणि अडत्यांच्या दुकानात फेकावा लागतो. जर मालाला भाव असेल तर गावही त्या शेतक-याच्या भोवती गोळा होते. पण गावातल्या अनेक शेतक-यांनी ऊस, द्राक्षे, पळाटी, स्ट्रॉबेरी, पिकवलेय. अशा श्रीमंत शेतक-यांच्या मालाला भाव मिळतो. पण सर्व सामान्य शेतकरी मात्र-

आणि तू तर शहीद झालास / कांद्यासाठी![१३१]

शेतक-यांच्या कितीतरी पिढ्या पारंपारिक पिके काढत आहेत. नेहमीच पीक बाजारात नेऊन ओशाळलेल्या नजरेने लीलावाची वाट पाहत हे शेतकरी बाजारात बसतात. मालावर म्हणत म्हणत त्या शेतक-यावरच बोली आजवर लावली गेली. आता या शेतक-याच्या एका तरी पिढीने बाजारपेठेवर संशोधन केले पाहिजे. त्याचप्रमाणे-

नवीन संघर्षशील / उपजाऊ वाणासाठी[१३२]

संशोधन केले पाहिजे असे कवी म्हणतो.

बेभरवशाचा बाजारभाव यामुळे शेतक-यांची होणारी गळचेपी याचे दर्शन नारायण सुमंत यांची कविता घडवते.

बदलते शेतकरी जीवन

बदलत्या शेतकरी जीवनाचा वेधही कवीने घेतला आहे. माणसाचे आचार विचार व राहणीमानही बदलत आहे. त्यामुळे शेतकरी जीवनही बदलत आहे.

वाडवडील आपल्या मुलाबाळांना शेतीविषयक सल्ले देत असत. कवीचा आजा'बा'ला सांगायचा पेरलेलं कवाबी वाया जात न्हाई! आज्याच्या बोलानं बा राबत राह्यला, ओलेत्या संगट कोरडी बी रानं टिपणी खालती पेरीत नेली. वलेतल्यातलं धान्य निसावले. कोरड्या भुईतलं बी दबलं. सोळा आणं बा झिजला तेंव्हा सहा एक आणं उगवून आलं! तो बाप कवीला सांगू लागला वलेतील पेरलेलं वाया जात न्हाई. *बा*च्या बोलान कवीने वलीत टिपन काढली. तोवर कवीच वय निम्म झालं पण वलीतल पेर फुलात आलं न्हाई. संध्याकाळी वेळ जात नाही त्यावेळी हा शेतकरी बाप पोरांना सांगतो-

पेरल्यालं उगवलंच / याच भरवसा न्हाई! [१३३]

शेती करण्याच्या पद्धतीत व शेतीच्या सुरक्षिततेत काळानुसार बदल झाला. आज्याच्या काळात बिन कुंपणाचं शेत त्याने केले. तो काठीला सोने बांधून काशीला गेला. बापाने शेताला कुंपण घातले. मुलाला शाळेत पाठविले. आता मात्र या नातवाला आपल्या शेताच्या सुरक्षिततेबरोबरच आपल्या घराची सुरक्षाही आवश्यक वाटते. तो सावधानतेने पावले मोजीत आपल्या शेताच्या बांधावर चालतो तसेच-

वर्षातून एकदा / नजर टाकीत सातबा-यावर [१३४]

आता शेतकरी अधिकच सुधारला. तो ग्रीन हाऊसमध्ये शेती करू लागला. ग्रीन हाऊसमध्ये ऊन, वारे, मोवतालचे जीव, पाखरे, पाऊस यांच्याशी नाते तोडून माती बंदिस्त केली जाते. नंतर आपल्या मनाच्या संकल्पनेनुसार रोपे अथवा बीजे लावून उत्पादन घेतले जाते. पाणी, तापमान यावर नियंत्रण ठेवले जाते. मग पिकांना लाभते अमर्याद वाढ जी अनैसर्गिक व बहुप्रसव असते. जी पंचतारांकित हॉटेलची डिमांड भागवते. शेतक-यालाही गुंठा दोन गुंठ्यात नफा होत राहतो. बाहेरचे तपमान आणि रोग यांची भिती या ग्रीन हाऊसला नसते. बाकी सर्व सामान्य लोकांचे नियंत्रण करतात-

रेशन कार्डे / जहाजांच्या मदतीने! [१३५]

खेडेगावात शिक्षणाचा प्रसार झाला. नवी पिढी शिक्षण घेऊ लागली. वाड्या-वस्त्यांवर कुडांच्या भिंतींवर अक्षरे उमटू लागली. नवी पिढी कागदाची मशागत करण्यात गुंतते आहे. त्यांचे ज्ञान वाढत आहे. पण ही पिढी विसरू पहात आहे बियाणांना ओळीत पेरणे, मुठीत अवजारे पकडणे, त्यामुळे ही साक्षरता हे शिक्षण फक्त-

पिकणारी अक्षरे बेकार जळवा/वांझ बांडगुळे/नापिकता वाढविणारी/जी हिरवीगार केवळ कागदांवर [१३६]

शेतक-याच्या घरात आता शेती अवजाराऐवजी, बी बियाणा ऐवजी अक्षरांचा सुकाळ झाला आहे. एका शेतक-याचा सालकरी पेरण्यासाठी बी मागायला आला. शेतकरी सर्व घरभर बी शोधतो तर त्याला बियाणा ऐवजी पुस्तकांच्या थप्प्या सर्व घरभर सापडतात. शेवटी हा शेतकरी बी शोधून कंटाळतो व आपल्या सालक-याला म्हणतो-

शिवार पेरूत म्होरल्या डोईला / यंदा पडिक राहू दे वावर [१३७]

कवी असेच सर्व शेतक-यांना दु:ख, दैन्य यातून मार्ग काढण्याचा उपाय म्हणून शिक्षण घेण्याचे आवाहन करतो. तो म्हणतो जे शिकले ते गावाकुसापासून या गचपणातून किती तरी दूर अक्षरवाटेने गेले. माणसांचा गरजता, उसळता, बोलता समुद्र होऊन साक्षरतेला कवेत घेऊन ते पुढे गेले. पण गावातल्या शेतक-यांच्या पिढ्यांवर मात्र काळा फतवा येणा-या पिकांच्या आशेवर म्हणून कवी सर्व शेतक-यांना शिक्षण घेण्याचे आवाहन करताना म्हणतो-

तू ओलांड हे कृष्णविवर / बांधाबाहेर ये [१३८]

तरीही शेतक-याच्यात निरक्षरता आहे. तो जमीन वहिवाटण्याच्या नादात पिढ्यान पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिला. तो फक्त आपल्या भरजरी पीकावर खुश होऊन फाटक्या मुंडाशात किंवा गांधी टोपीत खुश राहयचा. पण आता कवी म्हणतो यंदा तू तुझी शेतीची हत्यारे बाजूला ठेव व तुझ्या डोक्याची मशागत करून घे. बांध विसरून, औत विसरून यंदा तू शिक्षण घे कारण-

होईल पिढी न पिढी वाहीत; एकीसाठी / डोई नांगरच तू यंदा [१३९]

नारायण सुमंत यांच्या कवितेत बदलत्या शेतकरी जीवनाचेही चित्रण आले आहे. हा शेतकरी पूर्वीच्या शेतक-यापेक्षा हुशार व व्यवहारी आहे. म्हणूनच तो ओलीत फक्त पेरतो. ग्रीन हाऊसची शेती करतो. एवढेच नव्हे तर आपली परंपरागत शेती सोडून शिक्षण घेतानाही दिसतो.

दुष्काळ व त्याचे परिणाम

कवी नारायण सुमंत हे एका दुष्काळी प्रदेशात वास्तव्याला आहेत. ते स्वत: शेतकरी असल्यामुळे त्यांना दुष्काळ व त्याचे शेतीवर होणारे परिणाम पूर्णपणे माहित आहेत. त्यामुळे त्यांच्या कवितेतही त्याचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

प्रखर उन्ह दिवसभर तळपून दिवसाच्या शेवटी दिसबुडीला आलेली. या तीव्र उन्हामुळे माती भेगाळलेली, मरायला आलेली. झाडाच्या पानापेरातील ओलावा भोगण्यास चटावलेली उन्ह त्या झाडांची - पीकाची निसवण्यापूर्वीच लुटल्याची कळ त्यांच्या पोट-याप्रर्यंत भिनलेली. अशा पीकावर त्या शेतक-याची आर्त नजर पडलेली. नेमकं याचवेळी आभाळामध्ये ढग जमतात. पण तोपर्यंत त्या शेतक-याचे मन करपून गेले असते म्हणून कवी म्हणतो-

एका जिराईत संध्याकाळी / मी करपून गेल्यावर! [१४०]

पूर्वी पाऊस पडायचा, आभाळतले टपोरे थेंब पिऊन धान्य मुबलक पिकायचं. सटीच्या पावसाने तर रानाच सोनं व्हायचं. कवीही सुगीला नादवला. मुठीत येईल तितके पेरू लागला. पण बी मोड होऊ लागला. सोनं पेरून सुद्धा रान काही पिकत नाही. धरणीच्या मायेनं आभाळाचं मन काही भरत नाही. भुंडे-भुंडे माळ पाहून कवीच कधी कधी ढगाळतो. डोळ्यातील थेंबाच्या ओल्या खुणा क्षितिजापर्यंत पेरत जातो. आता फक्त मनामध्ये दु:खाचे कढ साचतात व त्याचीच फक्त सुगी येते आणि

खुणा पेरल्या मातीला / शब्द धुमारे फुटताना! [१४१]

दुष्काळाचे चित्र रेखाटताना कवी म्हणतो घरातल्या चालत्या भिंतीचे कोनाडे (म्हणजेच घरातील प्रत्येक माणूस) भूकेशी हितगूज करतोय. त्यावेळी बाहेर सूर्य आभाळालाही जाळू पाहतोय. उजाड बाभळीवर विसावलेला दुष्काळ उरलेल्या जिवंत सांगड्यानाही गिळू पाहतोय. एक दिवस मात्र पाऊस पडेल

तोही कसा तर सूर्याला गिळताना आभाळ हमसून रडेल.. त्याचं सुतक पाळायला बाभळीवरला दुष्काळ माळ सोडून पळेल. पण हे लौकर व्हायला हवं. नाही तर कोनाड्यातल्या भुकेकरता कोनाड्यातीलच पणत्या-

बेलाशक विझवल्या जातील / बाभळीवरल्या दुष्काळा करता! [१४२]

काहींना वाटते कालचा पाऊस आमच्या गावात पडलाच नाही. पण कवीला वाटते आजचा पाऊसही पडण्याची शक्यता नाही. पाऊस पडण्यासाठी वाळवंट विसरावी लागतात. जेथे झाडे तेथेच पाऊस पडतो. झाड्यांच्या पानातून थेंबाचा उरूस असतो. झाडे लावण्यासाठी पाणी घालण्यासाठी आभाळ हात जन्मावे लागतात. त्यामध्येही जातपात नसावी. ज्यांचे -हदय झाडाचे फक्त तेच वाढवतात झाडे. बाकीचे फक्त पिढीजात झाडे घेत राहतात. घरमेघांमुळे येथल्या झाडावर बांडगुळे पुष्ट झालीत. जोवर ही बांडगुळे आहेत तोपर्यंत झाड बहरणार नाहीत तोपर्यंत-

तोपर्यंत एकच शक्यता..... / त्यांच्या गावात पाऊस पडणे नाही! [१४३]

माढा : एक संदर्भ ही नारायण सुमंत यांची एक गाजलेली कविता. कवी या प्रदेशात राहतो तेथे वारसा हक्काने दुष्काळ सर्वांच्या वाट्याला येतो. कवी म्हणतो शिवाय उरातल्या धगीनं पेटलं आणि त्याचा परिणाम म्हणून पेटलेलं चिपाड होऊन गेलं. चुळकामर दुधासाठी तान्ह्या मुलांना रडण्याची वेळ आली. या पिकांना विचारलं बिगर लुंग्याच मातीतून तुम्ही कशापायी उगवलात. कोणत्या कर्माचं पाप पिकण्याच सोंग घेतलय. त्यावेळी पीकं बोलली-माणसांपेक्षा झाडांची दुष्काळ दु:ख फार अनावर असतात. कारण ते दु:ख शब्दालाही स्पर्शित नाही. ते पीक झाडाचे दु:ख काय असत हे बापाला विचारण्यास सांगतात. पोराबरोबर बोलताना बापाला हुंदका फुटला. बाप म्हणतो माझ्या विस्ताराचे संदर्भ मी तुला सांगणार नाही. फक्त संदर्भातील मुद्दे सांगतो ते आहेत दुष्काळ, पाझर तलाव, वांझविहिरी, दुष्काळी सडका, भुंडे माळ, कुसळ काटे, सुकडी, मिलो, बरबडा, ईचका इ. विशेष म्हणजे पाझरांना पाणी नाही, सडकांना डांबर नाही, झाडांना पान नाही, माणसांना मन नाही! येथे आहे निष्पर्ण रुक्ष झाडवळ आणि सांगाड्याची दुष्काळ बने. भाकरीच्या चतकोर चंद्रासाठी अमावस्येचे अंधार जिणे. बाप म्हणतो लेकराला तुला वाटेल असे का? तर नादान पोराच्या बापाचा हा वसा, नावडत्या राणीचा हा वसा; फिरत्या टोपीचा हा वसा! (म्हणजेच बदलत्या सत्तेचा वसा) हा वसा असा असला तरी पण तू शेतातली औत थांबवू नकोस. धरणाचं पाणे मागू नकोस. घेतला वसा टाकू नकोस बापाचे हे अनुभवाचे बोल ऐकून पोरगं पुन्हा-

कपाळावरला घाम निरपून / मी पुनींदा बाटूक काढाय युतलो / माढा: एक संदर्भ! [१४४]

दुष्काळी परिस्थितीत प्रतिकूल परिस्थितीला टक्कर देत जीवन जगणा-या जीवनाची ही कहाणी आहे.

महाराष्ट्रातील काही दुष्काळी प्रदेश असा आहे की जेथे ईशान्य व नैऋत्य हे दोन्ही पाऊस पडत नाहीत किंवा कमी प्रमाणात पडतात. ईशान्य मान्सून गोवा कोकणच्या रुपावर भाळून आपले सारे तारुण्य (सारा पाऊस) ओसंडून टाकतो. उरले सुरले थेंब मुंबईच्या भुलभुलैय्यावर छचोर पोरासारखा उधळत रसायनीच्या धुरात घुसमटून जातो. सह्याद्रीशी टक्करा देऊन नि:सत्व झालेले पौरुषहीन ढग घेऊन या दुष्काळी प्रदेशात (सवतीच्या प्रदेशात) येतो. उगाच गडगडाट व काळोख करून पौरुषत्वाचा अभ्यास करतो. मात्र इथली भूमी त्याच्या ही स्वागताला उत्सुक. आषाढस्य प्रथम दिने! ही या भूमीची अवस्था. ईशान्य मान्सूनच्या षंढत्वाने भूमीची जीर्ण झाली हिरवी वस्त्रे. ऋतुकाळाच्या अखेरच्या संधिकाळात शेवटची आशा नैऋत्येकडील पण तेथेही मान्सून अडकला विंध्य सातपुड्याच्या पर्वतात. शेवटी ही भूमी टाके घालू लागते पुन्हा-

त्याच जुनेराला / वर्षाऋतूचे अंतिम दिने! [१४५]

दुष्काळाचा परिणाम फक्त शेतीवर, पीकपाण्यावरच होत नसतो तर शेतक-याच्या संसाराची सर्व घडीच यामुळे विस्कटते. आखाडात पाऊस पडत नाही व खरीपाचे स्वप्नही विरते. पावसाअभावी रब्बीसाठी ठेवलेले बियाणेही गिरणीत भरडले जाते. त्या शेतक-याच्या मुलीचे लग्नही पैशाअभावी रखडते. मुद्दामच पाहुण्याला दिपावळीनंतरची ही तिथी गैरसोयीची असल्याचं कळवतो आणि तीच थोरली मुलगी-

पुन्हा तेच जुनेर नेसून / थोरली शोधायला जाते / जळण काटुक [१४६]

आधुनिक तंत्रज्ञानाने पावसाचा अंदाज अगोदरच करता येऊ लागला. पण त्याचा शेतक-याला किती फायदा झाला हा एक प्रश्नच आहे. या कवितेत त्याचे प्रतिबिंब उमटले आहे. बाप आपाल्या मुलाला मालुवाफा चांगला करायला लावतो. त्याला वाटतं पीकाला घात चांगली आहे. पोरगं माथ्यावर पाहतं, तर एकच ढग. पोरगं हातातला दातूळ फेकून देऊन उपग्रह प्राप्त अंदाज पाहतो. त्यात महाराष्ट्रातील दोन ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त केला जातो. मग पिके शोधीत राहतात उपग्रहप्राप्त चित्रातील-

महाराष्ट्रातील / एक-दोन ठिकाणं! [१४७]

पाऊस हा प्रत्यक्ष शेतीसाठी किती उपयोगी पडतो हे महत्वाचे असते. अनेकवेळा पाऊस *समाधानकारक* पडला असे सांगितले जाते पण शेताला मात्र तो अपुरा ठरतो. कागदावरील अक्षरे फिकट करण्याइतपतच पाऊस पडतो. त्याने फक्त डांबरी रस्ता भिजतो. पेपरमध्ये पाऊस समाधानकारक झाल्याचे मथळे येतात. यामुळे सातबा-यावर फक्त आणेवारीमध्ये पिकलेली शेते दिसून येतात. म्हणूनच कवी म्हणतो-

पिकू लागते / आणेवारी / कागदांवर हिरवीगार! [१४८]

दुष्काळ, त्याचे शेतीवर होणारे परिणाम, त्याचे शेतकरी जीवनावर होणारे परिणाम, त्यातून येणारे दारिद्रय याचा वेध नारायण सुमंत आपल्या कवितेत घेतात. नारायण सुमंत स्वत: ;शेतकरी आहेत त्याचबरोबर ते दुष्काळी भागात राहतात. त्यामुळे त्यांना दुष्काळाची तीव्रता चांगल्या प्रकारे माहित आहे त्याचेच प्रतिबिंब या कवितेत उमटते.

राजकीय भाष्य करणा-या कविता

नारायण सुमंत आपल्या कवितेत राजकीय व्यंगावरही बोट ठेवताना दिसातात. भारतामध्ये प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या सोयीनुसार एक-एक चिन्ह आपल्या पक्षासाठी घेतले आहे. सर्व राजकीय पक्षांनी शेतक-यांशी संबंधित अशीच चिन्हे निवडली आहेत. हे लक्षात आल्यावर कवी त्यावर भाष्य करताना म्हणतो मला उगाचच परकेपणा वाटत होता. पण तुम्ही म्हणता तेच खरे. तुम्ही माझेच चिन्हांकित आहात. पहा बैलजोडी माझीच, नांगरधारी मीच, गाय-वासरू माझेच, चक्र माझ्या गाडीचेच, विळा-कोयताही माझाच, कमळ माझ्याच चिखलातले, या सर्वांसाठीचा हात तोही माझाच. त्यामुळे तुम्ही खरेच माझे चिन्हांकित. पण पुढे हा शेतकरी म्हणतो पण हे पाहिलेत का माझ्या हाताने आता मी तुमची वेसण धरली आहे कारण-

इथून पुढे आता / तुम्ही माझेच अंकित [१४९]

महात्मा गांधींनी स्वातंत्र्यासाठी नि:स्वार्थी वृत्तीने कार्य केले. पण त्यांचे अनुयायी असणारे व तसे सांगणारे सर्व नेते वा त्यांचा पक्ष भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकले आहेत. बापूजी निघून गेले पण त्यांची ही बकरी मागे राहिली. बापूजींनी जिवापाड सांभाळलेले आश्रम ही बकरी चरू लागली. बापूजी म्हणाले भारत हा कृषि प्रधान देश आहे आणि मग आयते आश्रम चरून पुष्ट झालेल्या बकरीने जन्म दिला बोकडांना,

बार्लिंग्यांना त्यांनी चरून जडावलेल्या जीभेने बापूजींचा आदर्श सांगितला व म्हणाले- भारत कुरण प्रधान देश आहे. मग हे मोकाट सुटलेले बोकड उभा देश चरू लागले आहे. वर ही बकरी बहु प्रसवा. पाच वर्षांचा नियम धाब्यावर बसवून ती केंव्हाही प्रसवते. अगदी मुदतपूर्वही. बोकडे तथा नेते पक्षही सारखा बदलतात. आत हे नेते उद्धट व मग्रूर झाले आहेत. गांधीजींकडेच बोट दाखवितात आणिम्हणतात गांधीजी आणि आम्ही दूधभाऊ; आख्खा देश आमचाच खाऊ. हे नेते आता चरत चरत कवीच्या गावातील शेतापर्यंत आले आहेत. हे बोकड चारा कमी आहे म्हणून आता खते पशुखाद्ये, सिमेंट बूट इतकेच काय कालव्यासह आख्खी धरणे खातात. यांना रोखावे म्हटले तर लगेच ते गांधीजींचाच पंचा घालतात व उपोषण करतात. सामान्य माणसाला मात्र हे त्रांगटं कसं सुटावं हा प्रश्न पडला आहे. या भ्रष्टाचारी नेत्यांसाठी कोर्टाचे जाळेही अपुरे आहे. शेतक-याचे कुंपण शेत खात होते तेंव्हा कुंपण उखडून फेकून दिले. आता जे जनतेचे पालनकर्ते तेच त्यांना खातात. म्हणून कवी म्हणतो मातीच पीकांना खाते तेंव्हा-

बापूजी मी कशी करावी शेती ? / बापूजी मी कशी करावी शेती? [१५०]

देशातील राजकीय परिस्थितीवर जळजळीत भाष्य करणा-या या कविता नारायण सुमंत यांनी उपरोधी शैलीत, तिखटपणे लिहिल्या आहेत. देशाची सद्य: परिस्थिती, त्यात सर्वसामान्य शेतक-याची होणारी कुचंबणा या कविता व्यक्त करतात.

शेतकरी व शासन

शासन व शेतकरी यांचे संबंध नेहमी गुंतागुंतीचे राहिले आहेत. शासनाकडून शेतक-यांना कधीच न्याय मिळाला नाही. नारायण सुमंत यांची कविताही हेच सांगते.

आपल्याकडील हरितक्रांती कशी आहे? तर हमीची नक्षत्रे प्रदुषणाने तुषार पद्धतीने बरसतात. सर्व योजना भ्रष्टाचाराने ग्रस्त आहेत. अवकाळ गाभणाच्या सलाईन वर निपचित हरितक्रांती पडली आहे. तिनं फक्त माळी टिळा लावलेला आहे-

उत्पादन शुल्काधारित / हमी भावाचा [१५१]

धरणाचे पाणी काही भागात देण्यात येणार म्हणून आश्वासन दिले जाते. प्रत्यक्षात दिले जात नाही. काही ठिकाणी पाणी अतिरेक प्रमाणात तर काही ठिकाणी पाणीच नाही अशी अवस्था. याचेच प्रतिबिंब कवीच्या एका कवितेत पडते. शेतक-याच्या कोपीत रेडीओ लावला आहे त्यावर बातमी

सांगितली जाते. धरणातील पाणी सोडल्याने पंढरपूर अद्याप पाण्यात. शेतकरी मात्र शेतात पाणी पाजत असतो व त्याला एकोणिसावा वाफा भिजेल की नाही याची चिंता पडलेली असते. त्याच्या कोपीत बसलेला मुलगा त्याला विचारायला येतो. एक-दोन पाटीवर काढून झाले. आता पाटीवर काय काढू? ह्यावर शेतकरी आटत आलेल्या वाफ्याकडे पाहून म्हणतो काढ धरणाचे चित्र आणि पुढे पाणी पाजू लागतो, त्यावर तो मुलगा पुन्हा येतो बापाकडे व विचारतो त्यावेळी शेतकरी मुलाला धरणातून वाहत आपल्या शेतापर्यंत आलेल्या पाटाचे चित्र काढावयास सांगतो. पण पोरगा मधूनच माघारी येतो व म्हणतो पहिले चित्र कशाने पुसू. त्यावर बाप एक वार आभाळाकडे पाहतो व आपल्या पोराला म्हणतो पाटी धर आभाळाकडे धरणाचे चित्र पुसण्यापुरते तरी-

दोन थेंब पडले / तर पडतील पावसाचे [१५२]

शासन अनेक योजना आखते पण त्या शेतक-यांपर्यंत पोहोचत नाहीत. तर काही भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकतात. शेतीबद्दलचे शासनाचे नियोजनही दूरदृष्टीचे नाही त्याचे प्रतिबिंब नारायण सुमंतांच्या कवितेत पडते.

साहित्य विषयक कविता

प्रत्येक कवी साहित्याबद्दल, कवितेबद्दल, कवीबद्दल आपल्या कवितेत काहीतरी मत प्रदर्शित करीत असतो. त्याबद्दल कविता करीत असतो. नारायण सुमंत यांच्याही काही कविता तशा पद्धतीच्या आहेत.

कवी आपल्या शब्दांद्वारे आपले विश्व उभे करतो. पण शेतात कष्ट करणारा शेतकरी अशीच नवी दुनिया उभी करत असतो. मिरगासाठी हाही चातक बनतो. वाफसा बघून पेरीत जातो. गर्द हिरवी अशी त्याची कविता फुलल्यावर वाटसरूही मोहरून जायचा. त्याचे शब्द पान फूल बनून झाडाझाडांना झोंबायचे. त्याचे शब्द पाखरं बनून आभाळभर भिरभिरायचे. त्याचे शब्द कणसं होऊन धाटाधाटांवर झुलायचे. पण तरीही, त्याच्या हातावर घट्टे होते. शिवाय त्याच्या नशिबी दारिद्र्याशिवाय दुसरे काहीच नव्हते. त्याच्या भोवती प्रपंचाचा गोता होता तरीसुद्धा-

पण हेही खरं..... तो..... / कवितेविना कवी होता. [१५३]

श्रमजीवी व्यक्तीची प्रत्येक कृती ही सुंदर कलाकृती असते असे कवीला वाटते. 'तमाम कष्टक-यांचा गौरव करणारी ही कविता आहे' असा गौरव या कवितेचा पाठ्यपुस्तक मंडळाने केलेला आहे.

शिक्षण व प्रबोधनाचा प्रवाह ज्याच्यापर्यंत पोहोचला पाहिजे होता त्या शेतकरी वर्गापर्यंत हा विकास पोहोचला नाही म्हणून स्वातंत्र्याला पंचवीस वर्षे झाल्यानंतर शेतकरी बोलू लागला. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षानंतर तो शेतकरी वाचू लिहू लागला. त्यावेळी त्याच्या हातात कवितेचे अनियमित अ-नियतकालिक आले. त्यातले साहित्य, त्यातील शेतीबद्दलचे अज्ञान पाहून तो शेतकरी आपल्या मालकाला विचारू लागला. पीक खुरपता येते तसे साहित्य खुरपता येईल का? नांगरता येते वावर तशी भाषा नांगरता येईल का? प्रत्येक माळावर या पुस्तकांनी भरलेल्या इमारती पाहून ते एक बिन उपयोगाचे साहित्य वाटते म्हणून तो शिकलेल्या मालकाला प्रश्न विचारतो-

मालक / 'डंपिंग स्टेशन' म्हणजे का हो? [१५४]

त्याला हे साहित्य म्हणजे डंपिंग स्टेशन मधले साहित्य वाटते.

मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण कसे चुकीचे आले आहे हे कवी येथे उपहासात्मक शैलीत सांगतो. कविता लिहिताना शेतीबद्दलचे अज्ञान काही कवी प्रकट करतात. हे कवी टेबल लॅम्पच्या रणरणत्या उन्हात कविता लिहितात. त्यांच्या कवितेतील शेतकरी पहिल्या ओळीत शेत नांगरतो, दुस-या ओळीत काळेभोर ढग निघतात, मृगाच्या धारा कोसळतात, मोर नाचतो, तिस-या ओळीत पीके डोलू लागतात, चौथ्या ओळीत लगेच सुगी होते व शेतकरी आनंदाने रास भरू लागतो. कवितेत शेती अशी पिकते. पण प्रत्यक्षात शेतांमध्ये ग्रीन हाऊसमधील कोथींबीर ही पिकविण्यासाठी तीन-तीन आठवडे काबाडकष्ट करावे लागतात. पण ही गोष्ट कवीसारख्या साक्षर माणसाला माहित नाही म्हणूनच कवी म्हणतो-

कविता विज्ञानाच्याही पुढे / दहा पाऊले / हेच खरे. [१५५]

पहिलीच्या पुस्तकात आढळणारे भैरु, हैबती आणि दौलती हेही अशाच प्रकारचे आहेत. सुपर फास्ट एक्स्प्रेसच्या प्रवासात खिडकीतून बाहेर डोकावून चितारलेले हे भैरु, हैबती आणि दौलती पहाटे उठतात गरम भाकरी दही-लोण्याच्या बरोबर खातात, गोटंयर गाणी गातात हे पाहिल्यानंतर यात आपला बाप कसा नाही असा प्रश्न कवीला पडतो. तो बाप सकाळी उठून शिळी भाकरी तिकटाच्या फक्की बरोबर खातो.

फाटक्या कपड्यात थंडी सोसतो. आता याच हैबतीने बँकांच्या जप्तीची व सोसायटीच्या नोटिसांची हाय खाल्लीय. दौलतीची दौलत असणारी सर्जा-राजाची बैलजोडी कधीच कत्तलखान्यात हवाबंद झालीय. त्यांच्या आर्त किंकाळ्या अजूनही ऐकू येतात. भैरुही गोदीमध्ये गोण्या वाहतोय. हे तिघेही उद्या तालुक्याला वीज कनेक्शन कट करू नका म्हणून विनवायला जाणार आहेत. पण जर घेराव घालून हे थांबले नाहीत तर त्यांचा उद्रेक इतका वाढेल की-

सांगता येत नाही कदाचित / उद्या ते जोडाही भिरकावतील / सार्वभौम संसदेच्या दिशेने! [१५६]

कवी नारायण सुमंत यांच्या कवितेची आशयसूत्रे अशा प्रकारची आहेत. त्यांच्या कवितेत निसर्ग कविता व वास्तववादी कविता यांचा सुंदर मिलाप झाला आहे. निसर्ग कवितांमध्ये वृक्षांच्या बाबतीत कवीने केलेला विचार थक्क करायला लावणारा आहे. ते वृक्षांच्या बाबतीत त्यांचे वर्णन, वैशिष्टये, त्यांचा निसर्गाशी सहसंबंध, त्यांचे महात्म्य, त्यांचा मानवाशी संबंध, त्यांचा अंत, याशिवाय कलम, बागा इ. बाबतीत ते लिहिताना दिसतात. वृक्षांशी ते एकरुप झालेले आहेत. त्यांचे तादात्म्य झालेले आहे. असे त्यांच्या कवितेवरून दिसून येते. त्यांच्या काही प्रेम कविताही आहेत. पण तुलनेने कमी प्रमाणात आहेत. पण त्याही सकस नाहीत. निसर्गाचे वर्णनही कवी तितक्याच ताकदीने करतो.

नारायण सुमंतांच्या शेतकरी जीवनावर असणा-या कविता त्यांच्या व्यक्तिमत्वाची वेगळी ओळख करून देतात. शेतकरी जीवनाची पूर्णपणे जाण त्यांना दिसून येते. शेतक-यांचे दु:ख, त्यांच्यावर होणारा अन्याय, त्यांचे बदलते जीवन, शेतकरी, शासन, शेतीवरील आक्रमणे त्याचबरोबर विशेष म्हणजे कवीने शेतक-यांना नेहमी तोंडघशी पाडणा-या बाजारपेठेवरही प्रकाश टाकला आहे. याशिवाय राजकारणावर व साहित्यातील न्यूनतेवर उपरोधपूर्ण शैलीत टीका करताना कवी आढळतात.

कवी नारायण सुमंतांच्या कवितांची आशयसूत्रे पाहिली की, त्यामध्ये वरीलप्रमाणे विविधता, आशयघनता व प्रतिमांचा सढळ हाताने केलेला वापर दिसून येतो.

प्रकरण दोन

संदर्भ

१ नारायण सुमंत, रानभैरी, करमाळा, अनुराधा प्रकाशन, १९८३, पहिली आवृत्ती, पृष्ठ-२४

२ तत्रैव, पृष्ठ -२५

३ तत्रैव, पृष्ठ -२६

४ तत्रैव, पृष्ठ -२७

५ तत्रैव, पृष्ठ -३०

६ तत्रैव, पृष्ठ -३३

७ तत्रैव, पृष्ठ -३६

८ तत्रैव, पृष्ठ -४१

९ तत्रैव, पृष्ठ -४४

१० तत्रैव, पृष्ठ -३१

११ नारायण सुमंत, वृक्षवेद, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, १९९३, प्रथमावृत्ती, पृष्ठ - ७

१२ तत्रैव, पृष्ठ -१२

१३ तत्रैव, पृष्ठ -१३

१४ तत्रैव, पृष्ठ -२०

१५ तत्रैव, पृष्ठ -२१

१६ तत्रैव, पृष्ठ -२२

१७ तत्रैव, पृष्ठ -२४

१८ तत्रैव, पृष्ठ -२८

१९ तत्रैव, पृष्ठ -२९

२० तत्रैव, पृष्ठ -३५

२१ तत्रैव, पृष्ठ -४८

२२ तत्रैव, पृष्ठ -५३

२३ तत्रैव, पृष्ठ -५६

२४ तत्रैव, पृष्ठ -५७

२५ तत्रैव, पृष्ठ -५८

२६ तत्रैव, पृष्ठ -५९

२७ तत्रैव, पृष्ठ -६०

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

२८ नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ - ५४

२९ तत्रैव, पृष्ठ -८०

३० तत्रैव, पृष्ठ -६८

३१ तत्रैव, पृष्ठ -७४

३२ तत्रैव, पृष्ठ -७५

३३ तत्रैव, पृष्ठ -७८

३४ तत्रैव, पृष्ठ -९९

३५ तत्रैव, पृष्ठ -१०१

३६ तत्रैव, पृष्ठ -९८

३७ तत्रैव, पृष्ठ -९७

३८ नारायण सुमंत, रानमैरी, उ.नि., पृष्ठ - ४५

३९ तत्रैव, पृष्ठ -३९

४० तत्रैव, पृष्ठ -४०

४१ तत्रैव, पृष्ठ -२८

४२ नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ - ११

४३ तत्रैव, पृष्ठ -२५

४४ तत्रैव, पृष्ठ -३१

४५ तत्रैव, पृष्ठ -७२

४६ तत्रैव, पृष्ठ -७३

४७ तत्रैव, पृष्ठ -७६

४८ तत्रैव, पृष्ठ -८९

४९ तत्रैव, पृष्ठ -९१

५० तत्रैव, पृष्ठ -९२

५१ तत्रैव, पृष्ठ -१०४

५२ तत्रैव, पृष्ठ -६९

५३ तत्रैव, पृष्ठ -७९

५४ तत्रैव, पृष्ठ -८१

५५ तत्रैव, पृष्ठ -१०२

५६ तत्रैव, पृष्ठ -५१

५७ नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ - ५५

५८ तत्रैव, पृष्ठ -६१

५९ तत्रैव, पृष्ठ -६४

६० तत्रैव, पृष्ठ -६७

६१ तत्रैव, पृष्ठ -८६

६२ तत्रैव, पृष्ठ -१०६

६३ तत्रैव, पृष्ठ -७१

६४ तत्रैव, पृष्ठ -६६

६५ तत्रैव, पृष्ठ -८३

६६ नारायण सुमंत, रानभैरी, उ.नि., पृष्ठ - ३५

६७ तत्रैव, पृष्ठ -३८

६८ नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ - ३०

६९ तत्रैव, पृष्ठ -३२

७० तत्रैव, पृष्ठ -३३

७१ तत्रैव, पृष्ठ -५०

७२ तत्रैव, पृष्ठ -१७

७३ तत्रैव, पृष्ठ -५७

७४ नारायण सुमंत, रानभैरी, उ.नि., पृष्ठ - ४३

७५ तत्रैव, पृष्ठ -४९

७६ तत्रैव, पृष्ठ -२९

७७ नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ - ५

७८ नारायण सुमंत, रानभैरी, उ.नि., पृष्ठ - १७

७९ तत्रैव, पृष्ठ - ३९

८० नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ -१४

८१ नारायण सुमंत, रानभैरी, उ.नि., पृष्ठ - ५०

८२ नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ - ९

८३ तत्रैव, पृष्ठ - २६

८४ तत्रैव, पृष्ठ - ६२

८५ तत्रैव, पृष्ठ - १५

८६ नारायण सुमंत, रानमैरी, उ.नि., पृष्ठ - १६

८७ नारायण सुमंत, सातबारा, पुणे, श्री विद्या, प्रकाशन, २००२, प्रथमावृत्ती, पृष्ठ - २८

८८ तत्रैव, पृष्ठ - २९

८९ नारायण सुमंत, रानमैरी, उ.नि., पृष्ठ - ३२

९० तत्रैव, पृष्ठ - ४२

९१ नारायण सुमंत, वृक्षवेद, उ.नि., पृष्ठ - ६

९२ तत्रैव, पृष्ठ - १८

९३ तत्रैव, पृष्ठ - ६३

९४ तत्रैव, पृष्ठ - ८

९५ तत्रैव, पृष्ठ - १६

९६ तत्रैव, पृष्ठ - ६५

९७ तत्रैव, पृष्ठ - ७७

९८ तत्रैव, पृष्ठ - ८२

९९ तत्रैव, पृष्ठ - ८४

१०० तत्रैव, पृष्ठ - १०३

१०१ तत्रैव, पृष्ठ - १०७

१०२ तत्रैव, पृष्ठ - १०९

१०३ तत्रैव, पृष्ठ - ११०

१०४ तत्रैव, पृष्ठ - मलपृष्ठ

१०५ तत्रैव, पृष्ठ - १११

१०६ नारायण सुमंत, रानमैरी, पृष्ठ - ८

१०७ तत्रैव, पृष्ठ - १३

१०८ तत्रैव, पृष्ठ - ७

१०९ तत्रैव, पृष्ठ - १८

११० तत्रैव, पृष्ठ - ४८

१११ तत्रैव, पृष्ठ - १२

११२ तत्रैव, पृष्ठ - १४

११३ तत्रैव, पृष्ठ - २१

११४ नारायण सुमंत, सातबारा, उ.नि., पृष्ठ -१

११५ तत्रैव, पृष्ठ - ३

११६ तत्रैव, पृष्ठ - ४

११७ तत्रैव, पृष्ठ - १२

११८ तत्रैव, पृष्ठ - १६

११९ तत्रैव, पृष्ठ - १८

१२० तत्रैव, पृष्ठ - १०

१२१ तत्रैव, पृष्ठ - ११

१२२ तत्रैव, पृष्ठ - १४

१२३ तत्रैव, पृष्ठ - २०

१२४ तत्रैव, पृष्ठ - ३०

१२५ तत्रैव, पृष्ठ - २१

१२६ तत्रैव, पृष्ठ - १५

१२७ तत्रैव, पृष्ठ - ४६

१२८ तत्रैव, पृष्ठ - ८

१२९ तत्रैव, पृष्ठ - ३८

१३० तत्रैव, पृष्ठ - ९

१३१ तत्रैव, पृष्ठ - १९

१३२ तत्रैव, पृष्ठ - ६

१३३ तत्रैव, पृष्ठ - ३१

१३४ तत्रैव, पृष्ठ - १३

१३५ तत्रैव, पृष्ठ - ३६

१३६ तत्रैव, पृष्ठ - ३४

१३७ तत्रैव, पृष्ठ - ३५

१३८ तत्रैव, पृष्ठ - २

१३९ तत्रैव, पृष्ठ - ८

१४० नारायण सुमंत, रानमैरी, उ.नि., पृष्ठ - ५५

१४१ तत्रैव, पृष्ठ - ५६

१४२ तत्रैव, पृष्ठ - ५७

१४३ नारायण सुमंत, रानमैरी, उ.नि., पृष्ठ - ५८

१४४ तत्रैव, पृष्ठ - ६२

१४५ नारायण सुमंत, सातबारा, उ.नि., पृष्ठ - २४

१४६ तत्रैव, पृष्ठ - २६

१४७ तत्रैव, पृष्ठ - २७

१४८ तत्रैव, पृष्ठ - ३७

१४९ नारायण सुमंत, सातबारा, उ.नि., पृष्ठ - २२

१५० तत्रैव, पृष्ठ - ४०

१५१ तत्रैव, पृष्ठ - २३

१५२ तत्रैव, पृष्ठ - ३२

१५३ नारायण सुमंत, रानमैरी, उ.नि., पृष्ठ - ५४

१५४ नारायण सुमंत, सातबारा, उ.नि., पृष्ठ - ५

१५५ तत्रैव, पृष्ठ - ३९

१५६ तत्रैव, पृष्ठ - ४२